भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
POST REGD.NO./DHL/53/24-26
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२३७ ■ रविवार ३१ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## ना.विखे पाटलांनी बारा मुद्यांचा अधिकृत मसुदा जरांगे पाटलांच्या हाती दिला - हालचालींना वेग आला



**जालना, दि.३० - मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यभर पुन्हा एकदा वातावरण तापले असताना, मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी सकाळी १० वाजल्यापासून सर्वात कडक आणि विना मंडप आमरण उपोषणाची घोषणा केली होती. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अखेर महत्त्वपूर्ण आणि अधिकृत पाऊल उचलत मराठा आरक्षण उपसमितीचे प्रमुख तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना थेट आंदोलनस्थळी पाठवले. यावेळी त्यांनी राज्य सरकारतर्फे तयार करण्यात आलेला बारा मुद्द्यांचा अधिकृत मसुदा मनोज जरांगे पाटील यांच्या हाती सुपूर्द केला.**

आंदोलनस्थळी झालेल्या भेटीदरम्यान विखे पाटील यांनी मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असल्याचा पुनरुच्चार केला. सरकार तुमच्या सर्व मागण्यांवर गंभीरपणे काम करत आहे. त्यामुळे हट्ट सोडून उपोषण स्थगित करा. उपोषण करायचेच असेल तर भर उन्हात न बसता सावलीत बसा. आपल्या आरोग्याची काळजी घ्या, अशी भावनिक आणि आग्रही विनंती त्यांनी जरांगे पाटील यांना केली.

**प्रशासकीय दिरंगाईची सरकारकडून कबुली**

माध्यमांशी संवाद साधताना विखे पाटील यांनी प्रथमच काही प्रशासकीय त्रुटींची उघडपणे कबुली दिली. मराठा समाजाच्या मागण्यांवर शासन स्तरावर सातत्याने काम सुरू असल्याचे सांगताना त्यांनी काही क्षेत्रीय आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या पातळीवर झालेल्या विलंबामुळे समाजामध्ये नाराजी निर्माण झाल्याचे मान्य केले. मराठा समाजामध्ये निर्माण झालेला रोष आम्हाला समजतो. काही ठिकाणी प्रशासकीय प्रक्रियेत अडथळे आले, काही निर्णय अपेक्षित वेगाने झाले नाहीत. मात्र शासनाला हा प्रश्न प्रतिष्ठेचा बनवायचा नाही. सकारात्मक संवादातून आणि कायदेशीर चौकटीत राहून तो सोडविण्याची आमची भूमिका (पान ८ वर)

## महाराष्ट्र राज्यावर दुष्काळाचे संकट

मुंबई, दि.३०- महाराष्ट्रावर यंदा दुष्काळाचे सावट निर्माण होण्याची शक्यता आहे. यंदाच्या मान्सून हंगामात महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हवामान विभागाने जाहीर केलेल्या सुधारित अंदाजानुसार, जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात सरासरीच्या केवळ नव्वद टक्के पाऊस पडण्याची शक्यता असून, त्यामुळे पावसावर अवलंबून असलेल्या शेतीवर मोठा परिणाम होऊ शकतो.

डॉ. एम. रविचंद्रन आणि भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा यांनी सुधारित अंदाज जाहीर केला. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, राज्यासह मान्सून कोअर झोनमध्ये ९४ टक्क्यांपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. विशेषत: मध्य (पान ८ वर)

## केंद्र व राज्य सरकारच्या धोरण विरुद्ध ऐल्गार सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे अधिवेशन संपन्न

**नंदुरबार, दि.३०- सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या २२ वे राज्य अधिवेशन नंदुरबार येथील तालुका क्रीडा संकुल येथे संपन्न झाले. राज्यातील विविध भागांतून आलेले पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मित्र पक्षांचे नेते मोठ्या संख्येने या अधिवेशनात सहभागी झाले होते. सध्याच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर भाष्य करताना विविध वक्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली तसेच कष्टकरी, शेतकरी, आदिवासी आणि कामगारांच्या प्रश्नांवर आवाज उठविला.**




सभेला मित्र पक्षांचे नेते कॉ. राजेंद्र बावके, शामदादा गायकवाड अध्यक्ष, आरपीआय-सेक्युलर, मुंबई, कॉ. रामसिंग गावित, कॉ. किशोर ढमाले, कॉ. आर. टी. गावित, कॉ. रणजीत गावित, कॉ विक्रम गावित ,प्रा. प्रतिमा परदेशी, कॉ. होमाबाई गावित, कॉ. दिलीप गावित आदी उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष कॉ. करणसिंग कोकणी होते.यावेळी आपल्या भाषणात त्यांनी महागाई, बेरोजगारी, शेतकरी संकट, आदिवासींचे वनहक्क, शिक्षण व्यवस्था आणि लोकशाही संस्थांपुढील आव्हाने या विषयांवर सविस्तर भूमिका मांडली. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अधिक कठीण झाले असून त्याचा थेट परिणाम महागाईवर होत असल्याचे त्यांनी सांगितले. शेतीमालाला हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी प्रमुख व्यक्ते किशोर ढमाले यांनी आपल्या भाषणात बोलताना केंद्र व (पान ८ वर)

## तप्त उन्हात जरांगे पाटलांचे उपोषण राज्यातील समर्थकांची गर्दी वाढू लागली

**जालना, दि.३०- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणारे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. वाढत्या उन्हाचा पारा आणि घामाच्या धारांची तमा न बाळगता, मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवली सराटी येथे पुन्हा एकदा उपोषण सुरू झाले आहे. या कडक उन्हापासून स्वतः चा बचाव करण्यासाठी आणि आंदोलनाचा एल्गार कायम ठेवण्यासाठी त्यांनी आपल्या डोक्याला भगवा रुमाल गुंडाळला असून, याच अवस्थेत ते उपोषणस्थळी ठिय्या मांडून बसले आहेत.**

सध्या संपूर्ण राज्यात मे महिन्याच्या उन्हाचा तीव्र तडाखा जाणवत आहे. तापमान अंश सेल्सिअसच्या पार गेलेले असतानाही जरांगे पाटील यांनी आपले आंदोलन मागे घेतलेले नाही. उपोषणाच्या मांडवात उष्णतेची लाट जाणवत असताना, त्यांनी डोक्याला भगवा रुमाल बांधून ऊन सोसत आपले उपोषण सुरू ठेवले आहे. त्यांच्या या भगव्या रुमालाची आणि जिद्दीची सध्या सोशल मीडियासह संपूर्ण राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. (पान ८ वर)

## नंदुरबारला स.पा.चे आ.अबू आजमींची सभा

नंदुरबार, दि.३०- समाजवादी पक्षाचे नेते व आमदार आबु आझमी यांच्या प्रमुख उपस्थितीत नंदुरबार शहरात दि.३ जून रोजी भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील इलाही चौक येथे संध्याकाळी सात वाजता ही सभा होणार असून, सभेची तयारी पूर्ण झाली आहे.



समाजवादी पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सभेला जिल्हाभरातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. विशेष म्हणजे या कार्यक्रमात विविध पक्षांतील (पान ८ वर)



## इंधन बचतीचे धुळे पॅटर्न कौतुकास्पद मोदींच्या सुचनेला आमदारांचा प्रतिसाद

धुळे, दि.३०- जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीसाठी काटकसर आणि आर्थिक स्वावलंबनाविषयी आवाहन केले होते. त्यानुसार धुळे महापालिकेतील भारतीय जनता पक्षाच्या सर्व नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी स्वखर्चाने इलेक्ट्रिक बाईक खरेदी करून त्यांचा वापर करावा, अशी माझी इच्छा होती. त्या इच्छेला मान देत भाजपच्या सर्व नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी एकाच वेळी साठ इलेक्ट्रिक बाईक खरेदी केल्या. सर्व नगरसेवकांनी सकारात्मक आणि ऐतिहासिक प्रतिसाद दिल्याने इंधन बचतीचा हा धुळे पॅटर्न देशभरात कौतुकास्पद ठरेल, असा विश्वास शहराचे आ. अनुप अग्रवाल यांनी व्यक्त केला.

पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर गगनाला भिडले आहेत. यामुळे जगभरात इंधन पुरवठ्याचे संकट उभे राहिले असून, गॅस, पेट्रोल, डिझेल आदी इंधनाच्या पुरवठा साखळीत मोठा अडथळा येत आहे. या परिस्थितीत परकीय चलन साठ्यावरही ताण येत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काटकसर आणि आर्थिक स्वावलंबनासाठी सात आवाहने (पान ८ वर)

## रेल्वेगेटमनला मारहाण करणाऱ्या जितेश वसावेला चार वर्षाची शिक्षा

**नंदुरबार, दि.३० (प्रतिनिधी)- रेल्वे गेटमनला मारहाण करीत सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एकाला ४ वर्षाचा सश्रम कारावास व ६ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. हा निकाल नंदुरबार येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने दिला.**

नवापुर येथील महामार्गावरील नवरंग गेट क्र.६९ वर रेल्वे येणार असल्याने दोन्ही बाजुचे गेट हे रेल्वेगेटमन कन्हैया अजित कोकणी यांनी बंद केले होते. रेल्वे गेल्यावर गेट उघडले असता सिमेंट मिक्सरचे मोठे वाहन हे चुकीच्या दिशेने चालवून चालकाने पुढे नेत रेल्वे पटरीच्या मध्यभागी उभे केले होते. यामुळे समोरुन व मागून येणाऱ्या वाहन चालकांसोबत सिमेंट मिक्सर वाहन चालक व क्लिनर हे खाली उतरुन भांडण करीत होते. याठिकाणी वाहतुकीची कोंडी झाल्याने रेल्वेगेटमन कन्हैया कोकणी यांनी सदर वाहन चालकास वाहन पुढे नेण्याचे सांगितले. परंतु सदर वाहनचालक हे ऐकण्याच्या परिस्थितीत नसल्याने रेल्वेगेटमनने याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविले असता त्यांनी सिमेंट मिक्सर वाहनाचा क्रमांक लिहून घेण्याचा सांगितले. (पान ८ वर)

## जि.पशुसंवर्धक डॉ.गिरीश पाटलांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

**धुळे, दि.३०- पदविकाधारक पशुधन पर्यवेक्षक संवर्गाच्या विविध प्रलंबित व न्याय्य मागण्यांबाबत पशुचिकित्सा व्यवसायी संघटना, महाराष्ट्र राज्य, जिल्हा शाखा धुळे यांच्या वतीने दि. २९ मे २०२६ रोजी जिल्हा परिषद, धुळे येथे भोजन काळात निदर्शने करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, निदर्शनांपूर्वी मा. डॉ. गिरीश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्त, धुळे यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा करून प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी आवश्यक प्रयतक करण्यात येतील, असे आश्वासन दिल्याने नियोजित निदर्शने स्थगित करण्यात आली.**



पदोन्नती, प्रलंबित आगाऊ वेतनवाढ, परिविक्षाधीन कालावधी मंजुरी, मराठी-हिंदी परीक्षा सवलत, जुनी पेन्शन योजना तसेच इतर महत्त्वाच्या प्रशासकीय विषयांवरील प्रस्ताव अंतिम मंजुरीअभावी प्रलंबित असल्याने संघटनेने दि. १ जून २०२६ पासून असहकार आंदोलनाचा इशारा दिला होता.

या पार्श्वभूमीवर मा. डॉ. गिरीश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. बैठकीत मा. डॉ. गिरीश पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांच्याकडे प्रलंबित असलेल्या सर्व प्रस्तावांचा पाठपुरावा करून ते लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांनीही संबंधित प्रस्तावांबाबत सकारात्मक (पान ८ वर)

## अशोक खरात प्रकरणानंतर राज्यातील पन्नास भोंदू बाबांच्या गुन्ह्यात नाशिक जिल्ह्यातील पाच प्रकरणांचा समावेश

**शहादा,दि.३०(का.प्र.)- राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या नाशिक येथील भोंदू अशोक खरात प्रकरणानंतर अवघ्या सव्वा दोन महिन्यांत पोलिसांनी राज्यभरात मोठी कारवाई केली आहे. अंधश्रद्धेचा बाजार मांडणाऱ्या तब्बल ५० भोंदू बाबांचे दरबार पोलिसांनी उधळून लावले असून त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहेत. यात सर्वाधिक ५ गुन्हे एकट्या नाशिक जिल्ह्यात दाखल झाले असून, पुरोगामी महाराष्ट्राला चिंतेत टाकणारी आणि विचार करायला लावणारी ही आकडेवारी समोर आली आहे.**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अंनिस) राज्य सरचिटणीस शहादा येथील रहिवासी विनायक सावळे यांनी दिलेल्या माहितीनुसार,अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, बुवाबाजी संघर्ष विभागाचे कार्यवाह ड. रंजना गवांदे व सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांनी ही धक्कादायक माहिती प्रसिद्धीस दिली आहे.अंनिसचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी या सर्व ५० गुन्ह्यांची यादी संकलित केली आहे.पोलिसांनी दाखल केलेल्या प्रकरणांपैकी बहुतांश प्रकरणांमध्ये महिलांचे मोठ्या प्रमाणावर लैंगिक व शारीरिक शोषण झाल्याचे समोर आले आहे. भोंदू बाबांनी ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांतील महिला व पुरुषांची फसवणूक केली आहे. यात प्रामुख्याने महिलांच्या शारीरिक शोषणासोबतच त्यांची मोठी आर्थिक लूटही करण्यात आली आहे.सुरुवातीला भीतीपोटी आणि सामाजिक (पान २ वर)



## नाशिक विभाग आश्रमशाळा चालकांची शिरपूरला बैठक उत्साहात संपन्न

**धुळे, दि.३०- शिरपुर येथील के.व्ही.टी.आर. सीबीएससी इंग्लिश स्कूल येथे अनुदानित आश्रमशाळांना येणाऱ्या अडचणींसंदर्भात नाशिक विभागीय आश्रमशाळा संस्थाचालक संघटनेची बैठक नुकतिच घेण्यात आली.**

या बैठकीत अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या भरतीस तात्काळ मान्यता मिळावी, वर्गा चार कर्मचाऱ्यांच्या नेमणुका बाह्यस्त्रोतामार्फत (पान २ वर)

## केशव गार्डन येथे मेडिटेशन शिबीर

धुळे,दि.३०-शहरातील **केशव गार्डन येथे आज दि.३१ मे रोजी पौर्णिमेचे औचित्य साधून सायंकाळी ६ ते ७ या कालावधीत नि:शुल्क मेडिटेशन ध्यान साधना शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.**

ध्यान साधनेच्या माध्यमातून आंतरीक शक्ती, शांतता आणि सकारात्मकतेचे विचार, मानसिक संतुलन मजबुत करण्यासाठी ध्यान साधना नि:शुल्क करून घेतली जाणार आहे. ध्यान साधनेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन समिक्षा जैन यांनी केले आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,40,600 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,62,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त नवनिर्माण कार्यालयात जनजागृती

**नंदुरबार, दि. ३१ मे: जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त नवनिर्माण सर्व समाज हितार्थ संस्थेच्या कार्यालयात तंबाखूमुक्त समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी नवनिर्माण संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी तसेच एम.एस.डब्ल्यू. व बी.एस.डब्ल्यू.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांनी तंबाखूचे सेवन न करण्याची व इतरांनाही त्यापासून दूर राहण्यास प्रोत्साहित करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. संस्थेचे अध्यक्ष रवी गोसावी यांनी तंबाखूमुक्त समाजासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. यावेळी नवनिर्माण संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक मनिषा पाडवी यांनी तंबाखू सेवनामुळे होणारे आरोग्यावरील गंभीर दुष्परिणाम, कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारांचा धोका तसेच युवकांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाधीनतेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. समुपदेशक सुहास कोकणी यांनी आदिवासी समाजातील व्यसनमुक्तीसाठी संस्थेने केलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत समाज परिवर्तनासाठी जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित केले. एम.एस.डब्ल्यू. विद्यार्थिनी मोदा वसावे यांनी तंबाखूमुक्त कुटुंबांच्या अनुभवांवर आधारित जनजागृती उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमात बी.एस.डब्ल्यू. विद्यार्थिनी (पान ८ वर)

## गुंगीचे औषध देत सावत्र बापाचा मुलीवर अत्याचार

धुळे, दि.३०-सावत्र मुलीला गुंगीचे औषध देत तिचा अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून विवाह मोडण्याची धमकी तिच्या सावत्र पित्याने दिली. धुळे तालुक्यातील वरखेडी येथील या घटनेप्रकरणी पिडीतीने तक्रार देताच पोलिसांनी संशयीताला अटक केली.

वरखेडी येथील अठरा वर्षीय पिडीत तरुणी दि.२८ मे रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घरात स्वयंपाक करीत होती, सावत्र बाप योगेश प्रल्हाद सोनवणे तेथे आला. तो तिच्याजवळ उभे राहून आंब्याचा रस तयार करत होता, त्याच्या हातातून एक काळ्या रंगाची गोळी (पान २ वर)




## सि.गो.पाटील महा.विद्या.च्या विद्यार्थ्यांनी तीन हजार सिडीबॉल डॉ.नांद्रेंना केले सुपूर्द

**साक्री, दि.३०- सि.गो. पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी एकशे पन्नास सिडबॉल बनविण्याचे टारगेट दिलेले होते. दि. ३० मे रोजी सिगो पाटील महाविद्यालयातील प्राचार्य डॉ अनंत पाटील यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी तयार केलेले तीन हजार सिडबॉल निसर्ग मित्र समितीचे प्रमुख प्रा डॉ अजय नांद्रे यांच्याकडे सुपूर्द केले.**

सि.गो पाटील कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय साक्री येथील भूगोल विभागातील द्वितीय वर्ष कला (पान २ वर)

## बोगस बियाण्यांची वाहतुक ट्रॅव्हल्सने राजेस्थानच्या दोघानवर गुन्हा दाखल

**धुळे, दि.३०- गुजरातहुन खासगी ट्रॅव्हल्सद्वारे बेकायदेशीररित्या वाहतूक केले जाणारे प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाणे कृषी विभागाने जप्त केले. याप्रकरणी दोन जणांविरुद्ध धुळे शहर पोलिस ठाण्यात आज गुन्हा दाखल झाला.**

धुळे तालुका पंचायत समितीचे कृषी अधिकारी तथा बियाणे निरीक्षक जगदीश बोराळे यांच्यासह कृषी अधिकारी व बियाणे निरीक्षक विभाग व जिल्हास्तरीय पथकाकडून विविध ठिकाणी तपासणी सुरू आहे. परराज्यातून बोगस बियाणे येत असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पथक काल पहाटे गस्तीवर होते. पथकाने गुजरातकडून येणाऱ्या वाहनांची तपासणी सुरू केली होती. सकाळी सहाच्या सुमारास पाटील टूर अँड ट्रॅव्हल्स कंपनीची बस क्र. जीजे०४/एडब्लु- ६०९२ संतोषी माता चौकात आली. पथकाने गाडी थांबवून चालकाकडे चौकशी केली. चालकाने काहीही माल नसल्याचे सांगत एकच डिकी दाखवली, बस घेऊन वेगात निघून गेला. त्यामुळे तपासणी अधिकाऱ्यांचा (पान २ वर)



सेंद्रिय जांभुळ
संकेत नित्या फार्मचे
उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ
उपलब्ध
* संपर्क *
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

## मच्छिमार सोसायटीचे चेअरमनपदी भोई, व्हा.चेअ.पदी तव्वाब अन्सारी

**धुळे, दि.३०- येथील सातपुडा धुळे जिल्हा मच्छिमार सहकारी संघाच्या चेअरमनपदी हिरालाल भोई तर व्हा. चेअरमनपदी तव्वाब अन्सारी यांची निवड करण्यात आली.**




धुळे जिल्हा मच्छिमार सह.संस्थांच्या संघ मर्यादित धुळे या संघाची निवडणुक दि.२६ मे रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था शेखर साळी यांच्या उपस्थितीत पार पडली. निवडणुक निर्णय अधिकारी मुश्ताक सैय्यद यांनी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर चेअरमनपदी एकवीरादेवी मच्छिमार सहकारी संस्थेचे चेअरमन हिरालाल अमृत भोई यांची तर व्हाईस चेअरमनपदी भारतीय मच्छिमार सहकारी संस्था मौलवीगंजचे संचालक तव्वाब अन्सारी यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. संचालकपदी भिल मंगलसिंग देवमन, वसावे दिनेश अर्जून, राजपूत अशोक वना,(पान २ वर)

## मोलगी येथे वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

शहादा,दि.३०(का.प्र.)- अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथील मुळबीज शैक्षणिक संस्थेच्या मअल्फाबेट कोचिंग झोनफ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरातील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या प्रारंभी आदिवासी कुलदैवत याहा मोगी माता यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून (पान २ वर)




## भीम-फुले गीतकाव्य वाचन महोत्सव निकाल मुक्त विद्यापीठातर्फे जाहीर

नाशिक, दि.३०(प्रतिनिधी)- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे आयोजित भीम-फुले गीतकाव्य आणि कविता वाचन महोत्सव स्पर्धेचा निकाल विद्यापीठाचे मा.कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आला आहे. त्यात श्रीमती आंभोरे भाग्यश्री लक्ष्मण, लोभाजी पुंडलिक मुनेश्वर दोघेही अमरावती व श्रीमती ज्योत्सना प्रकाशराव पतंगे नाशिक यांनी संयुक्तरीत्या प्रथम क्रमांक पटकावला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना योग्य संस्कारक्षम पुस्तके वाचता यावीत आणि महामानव महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आदर व आपुलकीची भावना वाढावी या हेतूने विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात श्री. वीरेश्वर नागप्पा पुजारी (मुंबई) व श्रीमती प्रतिभा वसंतराव जोशी (अमरावती) यांना विभागून मिळाला आहे. तृतीय क्रमांकासाठी जयश्री श्रीरामजी पाचडे (अमरावती) व आबा भाऊसाहेब जराड (नाशिक) यांची निवड करण्यात आली. याशिवाय श्री. अक्षय (पान २ वर)

आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

# बहर






छत्रपती शिवाजी महाराजांनी गड, कोट, दुर्गाच्या साहयाने स्वराज्य उभे केले. त्यासाठी नविन किल्ले बांधले व जुने दुरुस्त केले.स्वराज्य स्थापनेत गड-किल्लूयांना महत्व प्राप्त करून दिले.त्यांच्या या आदर्श दुर्गनितीमुळे डोंगर द-यात वसलेल्या गड-किल्लूयांना श्रेष्ठत्व प्राप्त झाले.महाराष्ट्र हा गड-किल्लूयांचा देश आहे.गड-किल्लूयांच्या साहयाने वैभवशाली इतिहास घडला आहे. सहयाद्रिच्या कुशीत वसलेले गड-किल्ले शौर्याचे व पराक्रमाचे साक्षीदार आहेत.सहयाद्रितील डोंगर-द-यावरील गड-किल्ले म्हणजे स्वराज्याची महान शिल्पे आहेत. स्वराज्यातील प्रत्येक गड-किल्लूयांवरील शासनव्यवस्था अगदी चोख असे. छत्रपतींची अव्दितीयता व भक्कमता किल्लूयावरून दिसुन येते.छत्रपतींच्या स्वराज्यात गड, कोट, किल्ले, दुर्ग, गढ़या, जंजीरे यांना अनन्यसाधारण महत्व आहे. छत्रपतींच्या गड-किल्लूयांवरील शासनव्यवस्था आदर्श अशी होती.




## गड-किल्यांवरील आदर्श शासनव्यवस्था

**स्वराज्यातील दुर्ग व्यवस्था-** गिरीदुर्ग, वनदुर्ग, भुईकोट, जलदुर्ग म्हणजे सागरी किणा-यावरचे किल्ले, बेटांवरचे जंजिरे म्हणजे पाणकोट असे विविध प्रकारचे किल्ले असलेला अवघा महाराष्ट्र हाच किल्लूयांचे एक संग्रहालय आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची गाथा सांगत आजही हे उभे आहेत. छत्रपतींनी उभे केलेले सर्वच गड-किल्ले लढाऊ केले आहेत. महाराष्ट्रात आहेत तसे आणि तितके जगात अन्यत्र कोठे असे बालुम दुर्ग नाहीत. डोंगर-कडयावर व सागरी किणा-यावर किल्ले बांधणे व त्याची व्यवस्था ठेवणे,ते सुसज्ज आणि अधिक बळकट करणे याकडे काटेकोरपणे लक्ष दिले.स्वराज्यात दुर्गबांधणी व त्याची निगा राखण्यासाठी अठरा हजार लोक नियुक्त केले होते. यामध्ये स्वराज्यातील मावळयांबरोबरच परकीय लोकही वेगवेगळ्या किल्लूयाच्या कामावर नियुक्त केले होते.किल्लूयावरील शासनव्यवस्थेतील अधिकाऱ्यांबरोबरच बांधकामासाठी लागणारे अधिकारी, तंत्रज्ञ, बेलदार आदि. लोकांची कायमस्वरूपी नेमणूक केली होती.

**शासनव्यवस्था-**छत्रपतीच्या गड-किल्लूयांवरील शासन व्यवस्था अतिशय उत्तम अशी होती. किल्लूयावर वेगवेगळे अधिकारी नियुक्त केलेले होते.किल्लूयावरील प्रशासनात ढीलाई केल्यास कडक शासन केले जात असे. गुन्हेगारांना कडेलोटाची शिक्षा दिली जात असे. किल्लूयावर नियमांची काटेकोरपणे आमलबजावणी होत असे. छत्रपतींच्या नियंत्रणखाली सर्व अधिकारी डोळयात तेल घालून काम करीत असत. **हवालदार-** किल्ले व्यवस्थापनातील महत्वाचा अधिकारी म्हणजे हवालदार होय. पराक्रम व शौर्य पाहून त्यांची निवड केली जात असे.हवालदार हा मराठा जातीचा असे.किल्लूयावरील संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी या अधिका-याची असे. हवालदार हा किल्लूयाचा आत्मा होय. किल्लूयावरील लष्करी जबाबदारी त्यांच्यावर असे.एकंदरीत किल्लूयावर नियंत्रण ठेवण्याचे काम हवालदार करीत असे. किल्ला बंद करणे, उघडणे या गोष्टी स्वतः ते करीत असत. किल्लूयाच्या दरवाजाच्या च्यावव्या त्यांच्या ताब्यात असत.संध्याकाळ झाली म्हणजे किल्लूयाचा दरवाजा बंद करून त्यास कुलूप लावावे. हवालदाराने जातीने येऊन ते ओढून पाहावे व च्याव्या घेऊन आपल्या उशास ठेवाव्यात.किल्लूया सभोवती किल्लूयावरील अमलदारांनी रात्रीची पाळी पाळीने घस्त घालावी. जागो-जागी पहारे बरोबर आहेत की कसे ते रात्रीस एक दोन वेळा स्वत: येऊन पाहावे. हवालदाराने रात्रंदिवस सदरेस हत्यारबंद लोकांसह जागरूक रहावे. विशेषतः रात्रीच्या वेळी असावध राहू नये.

**सबनिस-** हा ब्राम्हण जातीचा असे. तो किल्लूयाचा अर्थप्रमुख होय. किल्लूयावरील रोखड त्यांच्या ताब्यात असे. किल्लूयावरील जमाखर्च लिहिण्याचे व त्याचा हिशोभ ठेवण्याचे काम सबनिसाकडे असे. किल्लूयावरील सैनिकांची हजेरी ते घेत असत.

**कारखानीस-** हा अधिकारी प्रभू जातीचा असे. किल्लूयावरील आठरा कारखान्याचा प्रमुख होय. किल्लूयावरील दुरूस्ती व डागडुजी या आधिका-याच्या नियंत्रणाखाली होत असे.किल्लूयावरील अन्नधान्य, चारा, पाणी, शस्त्रास्त्रे, दारुगोळा आदि. सर्वावर त्यांचे नियंत्रण असे. त्यांच्या खर्चाची व शिल्लकीची नोंद ठेवावी लागत असे.

**सरनौबत-** सरनौबत म्हणजे किल्लूयाचा तटरक्षक अधिकारी होय.तटसरनौबताची नेमणूक स्वतःछत्रपती करीत असत. किल्लूयाच्या तटाचे संरक्षण करण्याची पूर्ण जबाबदारी या अधिका-याची असे. किल्लूयाच्या प्रत्येक तटावर एक सरनौबत असे. तटसरनौबत कुलीन मराठा जातीचा असे.सिबंदी किल्लूयाच्या संरक्षण खात्यातील दुसरा अधिकारी म्हणजे शिबडी होय.

**संरक्षक चौक्या-** गडाच्या पायथ्याला संरक्षक चौक्या असत. किल्लूयाच्या संरक्षणाची छत्रपतींनी उत्तम व्यवस्था केलेली होती. पायथ्यापासुन ते गडापर्यंत संरक्षण व्यवस्था मजबुत होती. चौक्यावर पहारा देण्यासाठी रामोशी,भिल्ल, ठाकूर असे लोक सज्ज असत. किल्लूयाच्या बंदोबस्तासाठी निवडक रखवालदार नेमलेले होते. किल्लूयाच्या प्रदेशात बंदोबस्तासाठी रामोशी ठेविलेले असत. चौकीदार, नाकेदार वैगेरे या रक्षक नौकरांनी कोणती कामे करावीत याचे नियम तयार केलेले होते. एक किल्ला म्हणजे एका अर्थाने एक स्वतंत्र राज्यच किंवा एकंदर राज्यव्यवस्थेचा एक स्वतंत्र भाग असा मानला जाई.

**कारागिरवर्ग-** लोहार, सुतार, गवंडी, कुंभार, पाथरवट, चांभार इत्यादी कुशल कारागिर गडावर असत. गडावरील गरजा लक्षात घेऊन प्रत्येक गडावर कारागिर वर्ग ठेवण्यात आलेला होता.

**दुर्ग व्यवस्थापनातील नियम-** छत्रपतींनी गड-किल्लूयावरील अधिका-या संदर्भात कडक नियम केले होते. ते म्हणजे किल्लूयाजवळील लोक किल्लूयावर न ठेवावे त्या संदर्भात अज्ञापत्रामध्ये माहिती आली आहे ती अशी की, ;किल्लूयाचा हवालदार सरनौबती करीत असता तो मृत्ये पावला असता तो मामला त्याचे पुत्रास अथवा भाऊबंदास न सांगवा त्याचे पुत्र अथवा भाऊबंद असतील त्यांचे समाधान करून त्यांचे स्वरूपानुसार आणखी उद्योग सांगून चालवावें. **(पान ६ वर)**

# “आम्हनी माय अहिरानी जगमा तिन्ही न्यारी कहानी”!

## डिजिटल कीबोर्डवर ‘अहिराणी’ थाट: एका भाषेचा ऐतिहासिक विजय!

काय चाली राहीन भाऊ? कसा शे? - खान्देशच्या मातीतला हा लडिवाळ आणि आपुलकीचा आवाज जेव्हा आपण प्रत्यक्ष ऐकतो, तेव्हा मनात एक वेगळीच ऊब निर्माण होते. पण विचार करा, हाच संवाद जेव्हा तुमच्या मोबाईलच्या कीबोर्डवर थेट 'अहिराणी' पर्यायाच्या रूपाने समोर येतो आणि तुम्ही बोलून टाईप करू लागता, तेव्हा होणारा आनंद किती मोठा असेल? होय, ज्या भाषेला कधीकाळी नामशेष होण्याची भीती वाटत होती, त्याच आपल्या लाडक्या अहिराणी भाषेने आज जागतिक स्तरावर इतिहास रचला आहे!







अहिराणी भाषेला थेट इंडो-आर्यन भाषेचा अधिकृत आंतरराष्ट्रीय दर्जा मिळाला आहे. धुळे, जळगाव, नंदुरबार आणि नाशिकच्या काही भागांतून वाहणारी ही तापी मायची भाषा आता थेट जागतिक पटलावर जाऊन पोहोचली आहे. तंत्रज्ञानाच्या जगात मोबाईलवर व्हॉईस टायपिंग आणि थेट कीबोर्डवर अहिराणीचा पर्याय उपलब्ध होणं, हा केवळ भाषेचा सन्मान नाही, तर संपूर्ण खान्देशच्या स्वाभिमानाचा सुवर्णक्षण आहे.

### नामशेष होण्याच्या भीतीकडून जागतिक शिखराकडे!

काही वर्षांपूर्वीपर्यंत प्रादेशिक भाषांच्या भवितव्याबद्दल चिंता व्यक्त केली जात होती. इंग्रजी आणि इतर मोठ्या भाषांच्या प्रभावामुळे आपली मायबोली मागे पडेल की काय, अशी भीती अभ्यासकांना वाटत होती. परंतु, अहिराणीने या सर्व शंकांना खोटं ठरवलं आहे.

कोणतीही भाषा तेव्हाच जिवंत राहते जेव्हा तिची नवीन पिढी ती भाषा अभिमानाने बोलते. आज जगभरात राहणारा खान्देशी तरुण सोशल मीडिया, रील्स आणि डिजिटल विश्वात अगदी छाती ठोकून अहिराणी बोलताना दिसतोय. या नव्या दर्जा मुळे भाषेला एक कायदेशीर आणि तांत्रिक बळ मिळालं आहे, ज्यामुळे आपली बोलीभाषा आता डिजिटल जगात अमर झाली आहे.

### कोरोना काळ आणि ऐतिहासिक यशाचा पाया

या महाविजयाची सुरुवात आज झालेली नाही, तर याचा खरा पाया च्या कोरोना काळात, लॉकडाऊनच्या काळात रचला गेला. जेव्हा सगळं जग घरात बंद होतं, तेव्हा खान्देशी माणसांनी आपल्या भाषेला घराघरात आणि देशापरदेशात पोहोचवण्याचं एक अभूतपूर्व काम केलं.

त्या कठीण काळात ऑनलाईन विश्वात 'अहिराणी संमेलन' भरवण्यात आलं होतं. या संमेलनात केवळ खान्देशातीलच नाही, तर जगभरातील तब्बल देशांमध्ये राहणारे अहिराणी नागरिक, तरुण आणि अभ्यासक एकत्र आले होते. स्क्रीनवर जमलेल्या या खान्देशी माणसांनी आपल्या भाषेच्या संवर्धनाची, तिच्या अस्तित्वाची आणि तांत्रिक प्रगतीची एक व्यापक रणनीती आखली. तीच ऑनलाईन बैठक या ऐतिहासिक यशाची पहिली पायरी ठरली.

### जागतिक अहिराणी भाषा संवर्धन परिषद आणि विकास पाटील यांचे कार्य

कोणतीही चळवळ एका रात्रीत यशस्वी होत नाही, त्यामागे कोणाची तरी अहोरात्र मेहनत आणि जिद्द असते. अहिराणीला हा मान मिळवून देण्यात 'जागतिक अहिराणी भाषा संवर्धन परिषद' आणि भाषा अभ्यासक विकास पाटील यांनी अत्यंत मोलाचं कार्य केलं आहे.

वीरेंद्र सोनवणे, पुणे.
मो. ८८८८२४४८८३

विकास पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केवळ भाषेचे कौतुक करून न थांबता, तिला तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी कायदेशीर आणि तांत्रिक पाठपुरावा केला. भाषेचे नियम, तिचे व्याकरण आणि तिची पाळेमुळे आंतरराष्ट्रीय संस्थांसमोर भक्कमपणे मांडली. त्यांच्या याच चिकाटीमुळे आज गुगल आणि जागतिक भाषा प्रणालीमध्ये अहिराणीला हक्काचं स्थान मिळालं आहे.

### आता मोबाईलवर 'व्हॉईस टायपिंग'चा अहिराणी थाट!

या दर्जाचा सर्वात मोठा व्यावहारिक फायदा आपल्या रोजच्या जगण्यात होणार आहे. आतापर्यंत आपल्याला मोबाईलवर मराठी किंवा इंग्रजीत टाईप करावं लागायचं. पण आता थेट कीबोर्डवर अहिराणीचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

आता खान्देशातील आपली आजी किंवा आजोबा, ज्यांना टाईप करता येत नाही, ते मोबाईल समोर फक्त काय चालना पोऱ्या? असं बोलले, तरी स्क्रीनवर ते जशाच्या तसं टाईप होणार आहे. तंत्रज्ञानाची ही सोय अहिराणी भाषेला घराघरातील शेवटच्या माणसापर्यंत अधिक घट्टपणे जोडणार आहे. यामुळे भाषेचा वापर वाढेल आणि ती अधिक समृद्ध होत जाईल.

### जगभर वाजणार खान्देशी नाद!

आज धुळे, जळगाव, नाशिक, नंदुरबार इथले लाखो तरुण शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी अमेरिकेपासून ते लंडनपर्यंत जगभर पसरले आहेत. अनेकदा घराबाहेर पडल्यावर आपली भाषा मागे सुटते. पण या जागतिक दर्जामुळे परदेशात राहणाऱ्या खान्देशी तरुणांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आहे.

आता जगाच्या पाठीवर कुठल्याही कानाकोपऱ्यात उभे राहून, लॅपटॉपवर काम करताना किंवा मोबाईलवर बोलताना आम्ही अहिराणी बोलतो हे सांगताना प्रत्येकाची मान अभिमानाने वर होईल. ही भाषा आता फक्त शेतातल्या बांधावरची किंवा घराच्या ओट्यावरची राहिलेली नाही, ती आता जागतिक स्तरावर अधिकृत बनली आहे.


### ही तर फक्त सुरुवात आहे...

अहिराणी भाषेला मिळालेला 'इंडो-आर्यन' दर्जा हा खान्देशच्या सांस्कृतिक इतिहासातील एक मैलाचा दगड आहे. आपल्या पूर्वजांनी, अहिराणी कवींनी आणि साहित्यिकांनी जपलेला हा ठेवा आज खऱ्या अर्थाने जागतिक झाला आहे.

पण हा दर्जा मिळाल्यानंतर आपली जबाबदारी संपत नाही, तर ती खऱ्या अर्थाने सुरू होते. आता आपण आपल्या घरात, मुलांशी बोलताना, सोशल मीडियावर लिहिताना जास्तीत जास्त अहिराणीचा वापर केला पाहिजे. तंत्रज्ञानाने आपल्याला कीबोर्ड दिला आहे, आता त्यावर शब्द उमटवण्याचं काम आपलं आहे.

चला तर मग, आपल्या या ऐतिहासिक यशाचा आनंद साजरा करूया आणि जगाला अभिमानाने सांगूया- अमनि मायबोली अहिराणी, जगमं तिनी न्यारी कहाणी!

# आदर्श धैर्यवान राज्यकर्त्या अहिल्याबाई होळकर



राजमाता अहिल्याबाईंच्या जन्म सन १९७५ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील चौंडी या गावी माणकोजी शिंदे यांच्या कुटुंबात झाला. अहिल्यादेवी चे वडील माणकोजी शिंदे हे साधारण कुटुंबातील व्यक्ती होते ते मात्र अत्यंत धार्मिक व साहित्यिक मनोवृत्तीचे असल्याने आसपासच्या परिसरात सर्वच परिचित होते. त्याकाळी आजच्या सारख्या शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता. अहिल्याबाईंना कोणत्याही प्रकारचे शिक्षण मिळाले नव्हते शिवाय त्या काळात मुलींना शिक्षण मिळणे दुरापास्त होते.त्यांचे वडील माणकोजी आपल्या मुलीला घरीच लिहायला,वाचायला शिकवित असत. अहिल्याबाई मुळातच बुद्धिमान असल्याने धर्मग्रंथ व पोथ्यांचा अभ्यास लहानपणीच केला.

### स्त्री जन्म म्हणुनि न व्हावे उदास

महिलांना स्वातंत्र्याचा विचार ज्या काळात नव्हता त्या काळात राणी अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले काम आजही प्रेरणादायी असे आहे. विशेषतः मध्य प्रदेशातील महेश्वर येथील परिस्थिती जर आज पाहिली तर लक्षात येईल, की दूरदृष्टी आणि येणाऱ्या काळासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना यासाठी अहिल्यादेवींनी दिलेले विचार आजही प्रेरणादायी ठरतात.

विशेषतः महाराष्ट्रात ज्या शौर्यवान स्त्रिया होऊन गेल्या त्यामध्ये अहिल्याबाई होळकर यांचे नाव अग्रभागी घेतले जाते. सुभेदार मल्हारराव होळकरांचे पुत्र खंडेराव यांच्याशी लग्न झाल्यानंतर बुद्धी चतुर्याने सगळ्यांची मने जिंकली. त्यांनी कार्याची चुणूक दाखविली. त्यांचा धार्मिक व पुण्यशील स्वभाव एवढीच ओळख नसून त्यांचे बुद्धी चातुर्य, मुत्सद्दीपना,दूरदृष्टी, ज्ञानलालसा, खंबीरता, न्यायदान, आत्मविश्वास, राज्यकारभाराचे कौशल्य, स्वाभिमान,परदुःखात असणारे त्यांचे हळवे मन,कर्तव्य कठोरता,बाणेदार वृत्ती,साधी राहणी असे सदगुण त्यांच्यात होते.या सदगुणांचा समुच्चय म्हणजे अहिल्याबाई होळकर होय.

संजय धनगर, ओझर
मो. ९६३७३ २५१६०

मल्हाररावांचा राजकीय वारसा अहिल्यादेवी पती निधनानंतर रुढीपरंपरेने सती जायाला निघालेल्या अहिल्यादेवींना मल्हार रावांनी त्यांना सांगितले. पोरी आता माझा पुत्र तूच आहेस. अहिल्यादेवी यांना सती जाण्यापासून परावृत्त केल्यानंतर मल्हाररावांनी अहिल्यादेवींना लष्करी व राज्यकारभाराचे धडे अर्थात शिक्षण देण्यास सुरुवात केली. भारमल दादा या गुरूकडून घोडा रपेट,घोड्याची उडी, तलवारबाजी, तोफखाना चालविणे हे शिक्षण घेतले. एक ना एक राज्यकारभाराच्या क्षेत्रात आपले बुद्धी चातुर्य दाखवू लागल्या. मल्हारराव होळकर मनोमन सुखावले. आपला कारभार अहिल्याबाईंवर सोपवून मोहिमेवर निघत. फडणीशीतील राज्यकारभारातील सर्व अधिकारी चकितच झाले.जमीन वसूली वेळेवर झाली नाही. प्रजेच्या हिताची चिंता, लहान खेड्यापर्यंत मामलेदार मार्फत न्याय निवडा केला.सरदार इनामदारांपेक्षा शेतकऱ्याला ‘राजा’ मानले. प्रजाहित हे जीवनाचे ध्येय होते. पाणपोया, तलाव,पाय विहिरी, मंदिर बांधकाम, पुरातन मंदिरांचा जीर्णोद्धार केला. या सर्व श्रेष्ठ मुत्सद्दी व आदर्श राज्यकर्त्या होत्या. अहिल्यादेवींचे दूरदृष्टीचे उदाहरण म्हणजे हिंदुस्तानी सुभेदारांना आपल्या पत्रात त्यांनी सांगितले आपले मतभेद असतील तर राहू द्या. परंतु देशाच्या चारही बाजूंनी आपला सत्ताविस्तार करण्याची योजना इंग्रजांनी आखलेली दिसते.

पारदर्शी प्रशासनाची ओळख देणाऱ्या अहिल्याबाईंनी बांधलेले कित्येक घाट व मंदिरे फारच सुंदर, भव्य, दिव्य रमणीय आहेत. अनेक मंदिरात स्थापन केलेल्या मुर्त्याही अत्यंत कलापूर्ण व रेखीव आहेत. पूजा पोथीसाठी त्यांनी करून दिलेली व्यवस्था ही उच्च कोटीची होती. त्यांनी मुसलमानांना देखील सर्व प्रकारे मदत केली त्यांच्यासाठी मशिदी बांधल्या अनेक मुसलमानांना व फकिरांना जमिनी घरे व राहण्याच्या सनदा बहाल केल्या. देशाच्या सर्व भागात अहिल्यादेवींनी धर्मशाळा,विहिरी व तलाव बांधले व ते सर्वांसाठी खुले केले. विशिष्ट समाजासाठी त्यांनी सामाजिक सोयी राखून ठेवल्या नव्हत्या ही सर्व बांधकामे त्यांनी राष्ट्राला अर्पण केली होती. असे या पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाईंचे कार्यकर्तृत्व आहे. त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने कार्याचा थोडक्यात महत्वपूर्ण गोष्टींवर प्रकाश टाकला आहे.

*ऐसा जन्म लाभला देहाचे चंदन व्हावे.*
*आयुष्य संपले तरी सुगंध दरवळत राहो.*

# भक्तिभाव

डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

**आनंदी वाटचाल**


ईश्वराचे भजन पूजन, कीर्तन, प्रार्थना ,नामस्मरण व्रते,जपतप इत्यादी गोष्टींना सामान्यतः भक्ती असे म्हणतात. भक्ती आणि भक्ती भाव या गोष्टी मात्र एक नव्हे.भक्तिभावही विशिष्ट मानसिक भावना आहे. ती भावना मनात निर्माण करण्याकरिता ज्या क्रिया करण्यात येतात त्यांना भक्ती असे नाव सामान्यतः दिले जाते .भक्तीचे स्वरूप प्रत्येक धर्मात निर निराळे असते पण भक्ती भाव हा मनुष्याच्या धर्मावर अवलंबून नसून मुख्यतः त्याच्या ज्ञानावर अवलंबून असतो. वरवर भक्तीचे आचरण करणाऱ्याच्या मनात खरा भाव असतोच असा नेम नाही. असल्या भक्ती भाव शून्य आचरणा संबंधानेच अनेक संतांनी टीकात्मक उद्गार काढलेले आहे. मनुष्य भक्ती करतो की नाही या गोष्टीपेक्षा त्याच्या मनात भक्तीभाव आहे की नाही हाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. व्यवहारात भक्ती आणि भक्ती भाव यांच्यामधील भेदाकडे दुर्लक्ष करण्यात येऊन भक्ती हा शब्द मनातील भावना आणि बाह्य आचरण या दोन्ही अर्थाने उपयोगात आणला जातो. पण भक्ती भाव हे खरे साध्य असून व्यक्तीचे बाह्य आचरण हे भक्ती भाव निर्माण करण्याचे केवळ एक साधन आहे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. साध्य आणि साधन यातील भेद लक्षात न राहिल्याने साध्या पेक्षा साधनाला सामान्यतः जास्त महत्व देण्यात येते, आणि साधनाविषयी मतभेद उत्पन्न होऊन अनेक वेळा ते विकोपाला जातात निरनिराळे धर्म आणि धार्मिक पंथ यांच्या अनुयायात जी भांडणे, मारामाऱ्या, लढाया आणि अत्याचार होतात त्यांच्या मुळाशी हे आचार विषयक मतभेदच असतात .भक्ती आणि भक्ती भाव यांच्यामधील फरक लक्षात आल्यास हे कलह कमी होण्याचा संभव आहे.

भक्तिभाव म्हणजे काय ते पाहून गेल्यास असे लक्षात येते की सर्व विश्वाच्या कारभाराचे नियंत्रण करणारी कोणीतरी एक सर्वसामर्थ्यवान शक्ती विश्वाच्या मुळाशी आहे. जगातील सर्व स्थावर जंगम पदार्थ म्हणजे त्या शक्तीने आपल्या अतर्क लिलेने धारण केलेली निर निराळी रुपे होत. तिच्या प्रेरणेने विश्वातील सर्व कारभार चाललेला आहे अशा प्रकारची जाणीव मनुष्याच्या बुद्धीला झाली म्हणजे त्याच्या मनात जी भावना निर्माण होते तिला भक्ती भाव असे म्हणतात.त्या अतर्क्य शक्तीला परमेश्वर किंवा ईश्वर असे आपण म्हणतो आणि भक्ती भावाला ईश्वरनिष्ठा असे म्हणता येते. काम क्रोध लोभ भय इत्यादी भावना नैसर्गिक असतात.भक्ती भाव ही तशी नैसर्गिक भावना नव्हे. मनुष्य जसजसा ज्ञानवान होत जातो तस तशी ती भावना मनुष्याच्या मनात वाढत जाते. पृथ्वीवरील जे जे काही आहे ते सर्व परमेश्वराचीच रुपे आहे जगातील सर्व क्रिया घडवून आणणारा परमेश्वरच आहे अशा प्रकारची जाणीव ठेवून जे योग्य युक्त मनाने आपली कर्मे करतात त्यांना कोणत्याही तर्हे चे पाप पुण्य लागत नाही.

भक्ती भावाचे सु परिणाम व्यवहारात अनेक प्रकारे दिसतात. भक्ती भाव ही दैवी भावना आहे .ज्याच्या मनात ती असेल त्याच्या मनात आसुरी भावनांचा प्रवेश होऊ शकत नाही. भक्ती भाव असला म्हणजे अनिष्ट भावनांना येथे थारा मिळू शकत नाही असा व्यवहारात नेहमी अनुभव येतो .अहंकार भीती दुःख क्रोध द्वेष लोभ मत्सर इत्यादी अनिष्ट भावना भक्ती भावयुक्त मनुष्यात कधीच दिसत नाही आणि त्यांच्या मनाची शांती सहसा भंग पावत नाही. कोणत्याही मनुष्याची स्थिती सर्व आयुष्यभर एक सारखीच राहू शकत नाही. प्रत्येकाची स्थिती कालमानानुसार बदलते. कधी भरभराटीचे दिवस येतात त्यामुळे प्रत्येक गोष्ट मनाप्रमाणे घडत जाते कधी अपयश कधी संकटे हात धुवून पाठीमागे लागल्यासारखी दिसतात. या दोन्ही परिस्थितीमध्ये सामान्य मनुष्याची मनोवृत्ती निरनिराळ्या प्रकारची असते भरभराटीच्या काळी माझ्या प्रयतकामुळे मला यश मिळाले व मिळत आहे अशी अहंकाराची भाषा मनुष्य बोलतो. आपल्या यशात परिस्थितीचा किंवा इतरांकडून मिळालेल्या सहकार्याचा काहीतरी वाटा आहे अशी जाणीव त्याला सहसा राहत नाही.

ही अहंकाराची भावना वेळीच न आवरली गेल्यास मनुष्याच्या मनाच्या तोल सुटण्यास फारसा वेळ लागत नाही. भरभराटीच्या परिस्थितीमध्ये अहंकारामुळे बेताल न होणारी मनुष्ये सामान्यतःकमीच दिसतात. म्हणूनच भरभराटी नंतर पुन्हा अधोगतीला गेलेल्यांची उदाहरणे जगाच्या इतिहासात पुष्कळ सापडतात.

ज्यांच्या मनात खरा भक्तीभाव जागृत असतो ते सर्व करता-करविता परमेश्वर आहे या गोष्टीची जाणीव सदोदित मनात बाळगून परमेश्वराच्या कृपेने आपल्याला भरभराटीचे दिवस लाभले आहेत असे समजून त्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद देतात. आपल्या कर्तृत्वापेक्षा जेव्हा जास्त मिळते त्यासाठी परमेश्वराची कृपाच कारण आहे अशी जाणीव त्यांच्या मनात असते त्यामुळे ते गर्वाने आणि अहंकाराने चढून जात नाही उलट त्यांच्या अंगी नम्रता सौजन्य औदार्य विनय शिलता निगर्वीपणा सहानुभूती भूतदया इत्यादी सद्गुणांची वाढ होते. कर्म करणे आपल्या हाती आहे पण त्याची इष्ट फळे मिळणे किंवा न मिळणे परमेश्वराच्या आधीन आहे अशी भावना मनात जागृत असली म्हणजे फलासक्ती अहंकार उद्धटपणा उन्मत्तपणा परपिडावृत्ती इत्यादी दुर्गुण किंवा अनिष्ट भावना आपले डोके वर काढत नाही. इतरांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल मनुष्य कृतज्ञ असतो. त्याचे वागणे विनयशील नम्रपणाचे आणि सौजन्य युक्त असते.त्यामुळे त्याच्या संबंधाने इतरांच्या भावना साहजिकच चांगल्या होतात त्यांच्या कार्यात इतरांकडून सहसा अडथळे होत नाही तो स्वतः आपल्या उद्योगात शिथिलपणा येऊ देत नाही आणि या सर्व कारणामुळे त्याचे उत्तरोत्तर भरभराट होत जाते.



# पाणी

डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

**उमलत्या कळ्या**

अगं, अलका! उठतेसका?मी विहिरीवर पाण्याला जातेय. चूलीवर दूध तापत ठेवलयं. ओतू जाऊ देऊ नकोस. असंबोलता-बोलता सुमनताईंनी दोन हंडे उचलले नि त्या घराबाहेर पडल्या.

खरतरं अलकाला आज लवकर उठायचं नव्हतं.कालचं तिने पदवीच्या परीक्षेचा शेवटचा पेपर दिला होता.वीस दिवस चाललेल्या परीक्षेमुळे तिच्या मनावर काहीसा ताण आला होता.अभ्यासासाठी जागरण व्हायचं.झोप अर्धवट रहायची. कधी-कधी घरातल्या कामात मदत करतांना बराच वेळ जायचा. मग रात्री जागून अभ्यास करण्याशिवाय पर्याय नसे.

उद्या लवकर उठायचे नाही असं रात्री ठरवून झोपलेल्या अलकाला आईच्याहाकेने जाग आली होती. ती अंथरुणात उठून बसली. मागे वळून पाहिले तर आईने घरातली रिकामी भांडी खाली उतरवून ठेवली होती. त्यावरून अलकानं ओळखलं की घरातलं पाणी संपत आलय. मग ती झटकन उठली आणि अंथरूण-पांघरूणाच्या घड्या घालू लागली.

तेवढ्यातवरच्या आळीची मंजू दारात डोकावून म्हणाली, अलकाताई, येतेस का पाणी भरायला विहिरीवर?

कागं? नळाला पाणी येणार नाही का? अलकाने विचारले.

डोक्यावरीलहंडा कळशी पायरीवर ठेवून मंजू घरात आली. परीक्षा कशी गेली असं विचारू लागली.अलकाने तिचा प्रश्न टाळून विचारलं.

शाळेत जायचं सोडून तू पाण्याला का निघाली आहेस?

अगं ताई, पाईपलाईन फुटलीय.नळाला पाणी येणार नाही.म्हणून आईची सकाळपासून भूणभूणलागलेय मागं. मी एकटीनेच किती मरावं असं सारखं म्हणत असते. मग घेतली हंडा-कळशी नि निघाले विहिरीवर. आठवण आलीम्हणून तुला हाक मारली.

अगं पण मागच्याच आठवड्यात पाईप जोडला होता ना?लगेचफुटला?

ताई! दोन-तीन वेळा पाणी आलं की तिकडे पाईप तरी फुटतो,नाहीतर मोटार तरी जळते.

रोजतरी कुठे पाणी येतयंनळाला? चार दिवसांनी का होईना पाणी यायला पाहिजे.

सगळेजणतेच म्हणतात. मागच्या महिन्यात उंबऱ्यागणिक दोनशे रुपये गोळा केलेत.कोणी म्हणतात, पाईपलाईनचेपाईप जोडायला जनरेटर भाड्याने आणावा लागतो, कोणी म्हणतो साध्या प्लंबरला हे जोडाजोडीचे काम जमत नाही. खरं काय, खोटं काय तेच जाणोत.

मीही ऐकलय असं. या योजनेसाठी विशिष्ट प्रकारचे पाईप वापरलेत. ते सहजासहजी जोडता येत नाहीत.

ताई, सगळेजणवैतागलेत या परिस्थितीला. कंत्राटदार म्हणतोय, मला तुमचे पैसे नकोत की मदत नको. ही योजना ग्रामपंचायतीनं ताब्यात घ्या म्हणजे झालं.

मग ग्रामपंचायतही नळयोजना का नाही चालवायला घेत?

मी ऐकलय की कंत्राटदाराने पाईपलाईनचं काम नियमाप्रमाणं केलेलं नाही.

मग सरपंचानी कंत्राटदाराला जाब विचारायला हवा.


मागच्या एका ग्रामसभेत तशी विचारणा केली होती. त्यावर कंत्राटदार म्हणाला, शासनाने कामाचे पैसे दिले नाहीतर काम पूर्ण कसं करणार?

मगनळापर्यंत पाणी कसं येत?

अगंकंत्राटदाराने शासनाकडून उरलेली रक्कम मिळवण्यासाठी घाईघाईने पाणी गावापर्यंत पोहचवण्यासाठीजुगाड केलं. ग्रामपंचायतीलाना हरकत पत्र मागण्यासाठी कंत्राटदारानेयोजना तात्पुरतीयशस्वी करून दाखवली.

मग पुढे काय झालं?

गावातील काही लोकांना ही गोष्ट माहित होती. पाईपलाईन योग्यरितीने पुरलेली नाही. काही ठिकाणी दर्जेदार व मजबूत पाईप बसवलेले नाहीत.त्यामुळे ग्रामसभेतना हरकतचा ठराव मंजूर झाला नाही.



अगं!इथं काय गप्पा करत बसल्यात! तिकडंविहिरीवर जाऊन चार दुडी पाणी आणा ना. आख्खा दिवस पाणी लागत सुमनताईंच्याबोलण्यातलाराग ओळखून अलकानं हंडा-कळशी उचलली.मंजूनेही हंडा डोक्यावर ठेवला नि कळशी कमरेवर ठेवून दोघी गप्पा मारत विहिरीकडे निघाल्या.

हे असचं चालू राहीलं तरविहिरीतलं पाणी संपून जाईल. आणखी दोन किलोमीटर पायपीट करून पाणी आणावं लागेल. गावातल्यास्त्रियांचा दिवस पाणी भरण्यातच जाईल.अलकाने विषय काढला.

ते तर होणारच आहे. पण आपण तरी काय करू शकतो ?

मंजू, आपल्या गावातील महिलाबचत गटाला ह्यापाण्याचीजबाबदारीघ्यायला सांगू. आपणदोघी त्यांना मदत करू.

म्हणजेकसं?

अगं आता कशी महिन्याला दोनशे रुपये वर्गणी गोळा करतात, तशी वर्गणी गोळा करायची. त्याचा हिशोब ठेवायचा.एका महिलेला नियमितपणे पाणी सोडण्यासाठी मोटार चालू-बंद करण्याची जबाबदारी द्यायची. त्याबद्दल तिला योग्य असं मानधन द्यायचं. उरलेल्या पैशातून पाईपलाईन फुटली तर किरकोळ दुरुस्ती करायची.

अगंताई! तू म्हणतेस तसचं करायला पाहिजे. गावातलं कोणीच जबाबदारी घ्यायला तयार नाही.

अनुराधाची आई बचतगटाची अध्यक्ष आहे.त्यांना जाऊन आपण समजावून सांगू. सरपंचाशी बोलता येईल.

ते आपलं ऐकतील?

पाण्याची समस्या संपूर्ण गावाची आहे. सर्वांनाचवाटते की कोणीतरी समस्या सोडवावी. आपण जबाबदारी घेणार असू तर सर्वजण होकार देतील.

ताई! आज आपण घरातलं पाणी भरू. दुपारी सगळेजण घरी असतात. बचतगटाच्या महिलांशी सविस्तर बोलू.त्यांना सांगू की या जबाबदारीचा मोबदला म्हणून विशिष्ट रकम बचत गटाच्या खात्यात जमा करू.

अगं! गावातीलस्त्रियांना या पैशांपेक्षा पाण्याची समस्या मिटणे महत्वाचे वाटते. तरी आपण बोलू.

मग दोघींनी मोठ्याउत्साहानेविहिरीवरून चार दुडी पाणी वाहिलं.विहिरीवरील स्त्रियांच्या बोलण्याचा कानोसा घेतला.जाणाऱ्या-येणाऱ्या स्त्रियांशी त्या आपल्या मनातील कल्पनेविषयी बोलत राहिल्या.

पवनची काकी म्हणाली, मोटार चालू-बंद करायची जबाबदारी मी घेईन. मला मानधन नको.

स्मिता काकू म्हणाल्या, महिन्याला दोनशे रुपयांऐवजी तीनशे रुपये घ्या, पण घरापर्यंत पाणी यायला हवं. पाण्यावाचूनकाहीसुचत नाही.

अनुराधाचे वडील म्हणाले, तुम्ही महिला इतकी जबाबदारी घेत असाल तर आम्ही पुरुष मंडळी दुरुस्तीच्या कामातश्रमदान करू.

अलका नि मंजूच्या विचारांना गावाचं पाठबळ मिळालं.सरपंचानी पुढाकार घेऊन पाईपलाईनची दुरुस्ती करून घेतली. त्या संध्याकाळी गावात नळाद्वारे पाणी आलं. सर्वांना खूप आनंद झाला.दुसऱ्या दिवशी अलका व मंजूने पाणी आठवड्यातून कोणत्या दोन दिवशी, कोणत्या वेळेला सोडलेजाईल याचे वेळापत्रक तयार केले. त्या वेळापत्रकाखाली पाणी काटकसरीने वापरण्याच्या काही सूचना दिल्या. पाणी साठवण्याच्या आयडिया सुचवल्या. ही पत्रके चावडीवर, मंदिराच्या, अंगणवाडीच्या, रस्त्याला लागून असलेल्या घरांच्या भिंतीवर चिटकवली.बचतगटातीलप्रत्येक महिलेला आपापल्या शेजारील कुटुंबाची मासिक वर्गणी गोळा करण्यासाठी कुटुंबानुसार यादी करून दिली.

काहींना हे काम जमणार नाही असं वाटत होतं, त्या महिलांना अलकाने धीर दिला.नानी, तू फक्त आमच्यासोबत रहा. सगळा हिशोब आम्ही करू.नावंही लिहून देऊ.

मग दोन आठवड्यात चारदा गावात नियमितपणे नळाद्वारे पाणी आलं. गावकऱ्यांनीपिंप,टाक्यातून पाण्याची साठवणूक केली. पाणी तीन दिवसांनी येणार म्हणून सर्वजण पाण्याचा वापर जपून करू लागले.

पणतिसऱ्याच आठवड्यात पाईपलाईनएका ठिकाणी फुटली. पवनच्या काकीने लागलीच निरोप दिला. अनुराधाचे वडील गावात गेले. काही पुरुष मंडळीना घेऊन दुरुस्तीचा आढावा घेतला.पाईप जोडणे सहजशक्य होते. त्यांनीआवश्यक साहित्य खरेदी केले. निष्णात प्लंबरलाकामदाखवलं. त्याचामोबदला ठरवला.इतरपुरुषांनी खड्डा खोदायला, पाईप उचलायला, गरम करायला मदत केली. तीन-चार तासांच्या अथक प्रयतकाने पाईप जोडण्याचं काम पूर्णझालं.

दुसऱ्या दिवशी गावातनळाद्वारेपाणीआलं. सगळेजण पाणी भरतांना अलका नि मंजूचं नाव घेऊन कौतुक करत होते.

# वाणाचा ताण

(अधिक मासानिमित्त घसघशीत वाण मिळण्याची शक्यता असलेल्या असंख्य भाग्यवान जावईबापूंची मनस्वी क्षमा मागून)

पुण्याजवळच्या एका छोट्याशा गावात सदानंद आणि सावित्रीबाई राहत होते. दोन एकर शेती होती. वेळेत पाऊस पडला तर पीक, नाहीतर कर्ज. आयुष्यभर कष्ट करून आणि तणावात राहून त्यांनी संसार उभा केला होता.

तीन मुलींपैकी दोन मुलींची लग्नं झाली होती. धाकटी नेहा अजून कॉलेजला शिकत होती. मोठ्या मुलींचे सणवार, नेहाचं शिक्षण, शेतातील खर्च, खतं, बियाणं सगळ्याचा ताळमेळ घालताना सदानंदांना नाकीनव येत होतं.

तीन वर्षांनी येणारा अधिकमास आला. महिला वर्गात चर्चा सुरू होती मुलींच्या लग्नानंतरच्या पहिल्या अधिक मासाला हात आखडता न घेता लावलेलं वाण फार पुण्याचं असतं.

सावित्रीबाईंनी ठरवलं दोन्ही मुली आणि जावयांना यथोचित वाण द्यायचं.

सावित्री, वाण दे पण आपल्या परिस्थितीचा विचार करून, सदानंद म्हणाले, उगीच मोठेपणा करू नकोस.

मोठेपणा नाही, अहो मान आहे जावयांचा आणि मुलींचा.

शेवटी सदानंदांनी पंचवीस हजारांचं कर्ज काढलं.

दोन्ही मुली-जावई आले. घरात गडबड, हशा, गप्पा सुरू झाल्या. सावित्रीबाईंनी जावयांसाठी शर्ट-पँट घेतले. मुलींसाठी साड्या घेतल्या. भरमसाठ बिल भरताना सदानंदांच्या हाताला अक्षरशः कंप सुटत होता.

आता पंचवीसातले फक्त दोन हजार रुपये उरले होते.

पण सावित्रीबाई अजून शांत नव्हत्या. सोनं दिलंच पाहिजे.

अगं, पुरे आता, सदानंद जवळजवळ विनवणी करत म्हणाले, आपण कुठून उभे करणार पैसे?

पहिला अधिक आहे. त्या एका वाक्यापुढे सदानंद गप्प झाले. त्यांनी पुण्यातील ओळखीच्या सराफाला फोन केला. सराफ म्हणाला, तुम्ही घ्या काय हवे ते, पैसे दोन-तीन महिन्यांनी द्या.

सावित्रीबाई दुकानात गेल्या आणि काय योगायोग, तिथे त्यांना शाळेतील मैत्रीण रीना भेटली. रीना पुण्यात सुखात होती. तिचा नवरा इंजिनिअर. गाडी, फ्लॅट, नोकरचाकर सगळं होतं. लहानपणी गावात सगळे म्हणायचे रीना भारी आहे पण सावित्री लई भारी आहे.

मात्र आता परिस्थिती उलटी होती.

रीनाने हसत विचारलं, काय, इकडे कशी?

अगं, अधिक महिना ना दोन्ही लेकी आणि जावयांना वाण लावायचं आहे म्हणून आले इथे.

अय्या, खरंच! मलाही माझ्या दोन राजकन्या आणि जावयांना वाण लावायचं आहे. मी दोघींना एकेक तोळ्याच्या बांगड्या आणि जावयांना एकेक तोळ्याच्या अंगठ्या घेणार आहे. तू काय घेणार?




प्रतिष्ठा प्रतिष्ठेचा प्रश्न... मीही सेम टू सेम घेणार, सावित्रीबाई ठसक्यात म्हणाल्या. मी आलेच, म्हणत सावित्रीबाई दुकानाच्या मालकाला भेटल्या. भाऊजी, एक विनंती आहे. बोला वहिनी. गुप्त दानाचं पुण्य जास्त असतं असं म्हणतात. त्यामुळे मला वस्तू कुणालाही दाखवायच्या नाहीत. मी सांगते ते सगळं बॉक्समध्ये पॅक करा. सराफ गालातल्या गालात हसला. जसं सांगाल तसं. रीनाचा निरोप घेत सावित्रीबाई समाधानाने घरी परतल्या. आज त्यांनी तिची बरोबरी केली होती. वाण लावण्याचा कार्यक्रम झाला. मुलींनी आणि जावयांनी आदराने बॉक्स स्वीकारत सदानंद आणि सावित्रीबाईंना वाकून नमस्कार केला. बॉक्स घरी गेल्यावर उघडा, सावित्रीबाईंनी सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी मुली आणि जावई आपापल्या घरी निघून गेल्यावर घर सुनंसुनं वाटत होतं.

दिलीप कजगांवकर
पुणे मो.७७७००२५५९६

सायंकाळी फोन वाजला. मोठ्या मुलीच्या सासूबाई फोनवर होत्या. कौतुक फक्त तुमच्या मुली-जावयाचंच का? आम्ही कोणीच नाही का तुमचे? पण एक मात्र खरं, वाण छान दिलंत. हॅट्स ऑफ टू यू.

थोड्याच वेळात धाकट्या मुलीच्या सासूबाईंचा फोन. अहो, इतकं सुंदर आणि कल्पक वाण! मनापासून धन्यवाद. सदानंद आणि सावित्रीबाई खुश झाले. शेवटी प्रशंसा कोणाला आवडत नाही? तेवढ्यात सदानंदांच्या मोबाईलवर मेसेज आला. सराफ मित्राचा. सदा, बिल ७,०५,२०० रुपये. आरामात दे. सदानंदांच्या हातातून मोबाईल खाली पडला.

सावित्री।।. सात लाख? सावित्रीबाई मात्र शांत होत्या. आपल्याच मुली-जावई आहेत... पण एवढे पैसे कुठून आणायचे? क्षणभर शांतता पसरली. होईल हो व्यवस्था. का काळजी करता? सदानंद पुटपुटले, सावित्री, माझ्यासमोर दोनच मार्ग आहेत शेती विकायची किंवा अवयव विकायचे? कोणाचे? सावित्रीबाईंनी विचारले.

माझे, सदानंद म्हणाले. ठीक आहे, मग हरकत नाही, सावित्रीबाई म्हणाल्या.

सावित्रीबाई पुढे म्हणाल्या,

शेती विकू नका, राहू द्या. आपल्या उत्पन्नाचे एकमेव साधन आहे. जास्त कष्ट करून पैसे साठवू. पुढच्या अधिकाला अजून मोठं दान करता येईल. तोपर्यंत नेहाचंही लग्न झालेलं असेल त्यामुळे खर्च वाढेल.

सदानंदांना गरगरायला लागलं. सावित्री बीपीची गोळी दे एक नाही, दोन दे. सावित्रीबाई म्हणाल्या, मी माझ्या एका ओळखीच्या माणसाला फोन करते. ते लगेच मेसेज करतील. अगं, पण औषध कोण आणेल? त्यांचा मेसेज दोन-तीन वेळा वाचल्यावर बीपी आपोआप नॉर्मल होईल, औषध घ्यायला लागणार नाही, सावित्रीबाई म्हणाल्या.

सावित्रीबाईंनी फोन केला.

पुढच्याच क्षणी मेसेज आला. सदानंदांनी मेसेज दोन-तीनदा वाचला आणि काय आश्चर्य! सदानंदाचं टेंशन कमी झालं, चेहरा हसरा झाला, बीपी नक्कीच कमी झालं असावं. का? कसं? असा काय मेसेज होता तो? मेसेज होता क्षमस्व. लिहिताना चूक झाली. बिल ७,०५,२०० रुपये नाही. फक्त ५,२०० रुपये.

सदानंदांनी मोठा श्वास घेतला.

सावित्री आता खरं सांग. हे काय आणि कसे? सावित्रीबाई मंद हसल्या. प्रतिष्ठा जपायची होती. म्हणून रीनाला सांगितलं तू तुझ्या मुलींना जे देतेस, तेच मीही देते. मग? तुमच्या मित्राला सांगितलं प्रत्येक बॉक्समध्ये चांदीची लक्ष्मी टाका आणि मी लिहिलेल्या चार ओळी. म्हणजे त्यात सोनं नव्हतंच? नव्हतं. सदानंद अवाक झाले. सावित्री आज मला तुझा अभिमान वाटतो. पण त्या चार ओळी काय होत्या गं? सावित्रीबाईंनी मोबाईलमधील त्या स्वरचित ओळी ऐकवल्या

सोनं अंगावर घातलं तर शोभतं, पण ते जपत जगावं लागतं

म्हणून आम्ही सोन्याऐवजी संस्कार दिले, कारण संस्कार लपवावे लागत नाहीत ते आचरणातून आपोआप दिसतात.

आमच्या अल्पमूल्याच्या अधिकमासाच्या वाणामागील प्रेम, आपुलकी आणि आशीर्वाद मात्र अमूल्य आहेत.

आपण या वाणाचा मोठ्या मनाने स्वीकार करून आम्हाला उपकृत करावे, ही नम्र विनंती

**कथेचा विषय सूचविल्याबद्दल श्री गणेश भदाणे, चांदवड, जिल्हा नासिक यांचे विशेष आभार.**

# वृद्धत्व म्हणजे शेवट नाही तर अनुभवांनी समृद्ध झालेल्या आयुष्याची नवी सुरुवात!

आजच्या धावपळीच्या जगात प्रत्येक जण तरुण राहण्याचा प्रयतक करतो. केस पांढरे होऊ नयेत, चेहऱ्यावर सुरकुत्या दिसू नयेत, शरीर थकू नये यासाठी लोक हजारो उपाय करतात. पण खरं पाहिलं तर वृद्धत्व ही कोणती शिक्षा नाही, तर आयुष्याने दिलेली एक सुंदर देणगी आहे. जपानचे प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ आणि वृद्धांच्या मानसिक आरोग्याचे तज्ज्ञ डॉ. हिदेकी वाडा यांनी त्यांच्या The 80-Year-Old Wall या पुस्तकातून हाच संदेश जगाला दिला आहे.

हे पुस्तक प्रकाशित होताच लाखो लोकांनी ते डोक्यावर घेतले. कारण त्यात वृद्धापकाळाबद्दल भीती नव्हती, तर आनंदाने जगण्याचा मार्ग होता. डॉ. वाडा सांगतात की ६०, ७० किंवा ८० वर्षांचे होणे म्हणजे आयुष्य संपले असे नाही. उलट त्या वयात माणूस अधिक शांत, अधिक समजूतदार आणि अधिक आनंदी होऊ शकतो.

आज आपल्या समाजात अनेक ज्येष्ठ नागरिक एकटे पडतात. मुलं कामानिमित्त दूर असतात, शरीर थकते, मित्र कमी होतात आणि मनात नकळत भीती निर्माण होते. आता आपल्याकडून काही होणार नाही अशी भावना वाढते. पण डॉ. वाडा यांचे विचार याच मानसिकतेला बदलतात.

ते सांगतात चालत रहा.

कारण हालचाल थांबली की शरीर आणि मन दोन्ही कमकुवत होतात. रोज थोडे चालणे, सूर्यप्रकाशात बसणे, मित्रांशी बोलणे, हसणे आणि आवडीच्या गोष्टी करणे हे औषधांपेक्षाही प्रभावी असू शकते.

आजकाल अनेक जण छोट्या छोट्या गोष्टींवर रागावतात, चिंता करतात. पण वृद्धापकाळात शांतता सर्वात मोठे सामर्थ्य असते. राग आला तर खोल श्वास घ्या, मन मोकळे करा, जास्त विचार करू नका हे त्यांचे साधे पण प्रभावी तत्त्वज्ञान आहे.

त्यांच्या विचारांतील सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे एकटे असणे म्हणजे एकाकीपणा नाही. आपल्या समाजात एकटे राहणाऱ्या ज्येष्ठांकडे दयेने पाहिले जाते. पण कधी कधी एकांत हा स्वतःला समजून घेण्याचा सुंदर काळ असतो. पुस्तक वाचणे, भजन ऐकणे, बागकाम करणे, लेखन करणे, नवीन कौशल्य शिकणे ही सगळी कामे मनाला जिवंत ठेवतात.

डॉ. वाडा सांगतात की विस्मरण हे फक्त वयामुळे होत नाही; मेंदूचा वापर कमी झाल्यामुळेही होते. म्हणून नवीन गोष्टी शिकत राहणे अत्यंत आवश्यक आहे. वय कितीही असो, शिकण्याची इच्छा जिवंत असेल तर माणूस कधीच म्हातारा होत नाही.

आजच्या काळात सोशल मीडिया, टीव्ही आणि नकारात्मक बातम्यांमुळे लोक सतत तणावाखाली असतात. म्हणूनच ते सांगतात सतत टीव्ही पाहू नका, न आवडणाऱ्या लोकांशी संबंध ठेवू नका आणि जे आवडते ते जरूर करा. कारण आनंद देणाऱ्या गोष्टी मेंदूला सक्रिय ठेवतात.




त्यांच्या अनेक विचारांमध्ये एक सुंदर वास्तव दडलेले आहे आजाराशी लढण्याऐवजी त्यासोबत जगायला शिका. वृद्धापकाळात काही ना काही शारीरिक त्रास असतोच. पण प्रत्येक वेदनेशी युद्ध करण्यापेक्षा शांतपणे ती स्वीकारून आनंद शोधणे अधिक महत्त्वाचे आहे.

आज अनेक ज्येष्ठ नागरिक स्वतःला ओझे समजू लागतात. पण समाजाला त्यांचा अनुभव, शहाणपण आणि संयम यांची खूप गरज आहे. आपल्या घरातील आजी-आजोबा हे चालते-बोलते विद्यापीठ असतात. त्यांच्याकडे जीवनाचे अनुभव असतात, संघर्षातून मिळालेली ताकद असते आणि प्रेमाची अथांग संपत्ती असते.

म्हणूनच तरुण पिढीनेही वृद्धांकडे कमजोर माणूस म्हणून पाहू नये. त्यांच्या सोबत वेळ घालवा, त्यांचे अनुभव ऐका, त्यांना सन्मान द्या. कारण आज आपण तरुण आहोत, उद्या आपणही त्याच टप्प्यावर पोहोचणार आहोत.

डॉ. वाडा यांचा आणखी एक सुंदर विचार म्हणजे हसू हे भाग्य आणते. खरंच, आनंदी चेहरा सर्वांना आवडतो. हसणारा माणूस स्वतःलाही आनंद देतो आणि इतरांनाही ऊर्जा देतो. म्हणून वय काहीही असो, मनाने आनंदी राहणे हीच खरी तरुणाई आहे.

वृद्धत्व म्हणजे फक्त वाढते वय नाही; ती एक अशी अवस्था आहे जिथे माणूस स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे ओळखतो. जबाबदाऱ्या कमी होतात, अनुभव वाढतात आणि जीवन अधिक शांतपणे जगण्याची संधी मिळते. योग्य सवयी, सकारात्मक विचार आणि आनंदी दृष्टिकोन असेल तर ६० नंतरची वर्षे आयुष्यातील सर्वात सुंदर पर्व ठरू शकतात.

चला तर मग वय वाढण्याकडे भीतीने नाही, तर कृतज्ञतेने पाहूया. आपल्या घरातील ज्येष्ठांचा सन्मान करूया. त्यांना वेळ देऊया, प्रेम देऊया आणि त्यांच्याकडून जीवन जगण्याचे खरे धडे शिकूया.




# खानदेशातील समाजसुधारक आणि समाजसेवक

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळाचा विचार केला असता खानदेशात सामाजिक सुधारणेच्या दृष्टिकोनातून ज्या चळवळी झाल्या, त्यात खानदेशातील समाज सुधारक व समाजसेवक यांचे योगदान अविस्मरणीय असे आहे. समाज परिवर्तनाच्या समाज प्रबोधनाच्या चळवळी सोबतच,स्वदेशीची चळवळ घराघरात पोहोचवणे, विदेशी कापडाच्या होळ्या करणे, दारूबंदी, खादीचा प्रचार-प्रसार, याबरोबरच समाजातील अनिष्ट रूढी- परंपराविरोधात लोकांना जागृत करणे,सनदशीर मार्गाने आपले सुधारणावादी विचार लोकांपर्यंत पोहोचवणे,यासारखे कार्य या काळात अनेक समाजसुधारक व समाजसेवकांनी केले. समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात सुधारणावादी प्रयत्न करणाऱ्यांची खूप मोठी सूची आपल्याला देता येईल. त्यातील काही महत्त्वाचे समाजसुधारक व समाजसेवक यांच्या विषयी उपलब्ध माहितीच्या आधारे प्रकाश टाकीत आहोत.

**श्री.विनायक नरहर बर्वे उपाख्य दलित सेवक काकासाहेब बर्वे**
**पश्चिम खानदेश जिल्हा परिषदेच्या बैठकांतून शिक्षणप्रसार, भिल्लांची...**

सुधारणा, शाळातून खादी प्रचार, दारूबंदी यासारखे ठराव मांडून 'अस्पृश्यता निवारणासाठी' प्रसंगी विरोध पत्करण्याची तयारी ठेवत काकासाहेब बर्वे यांनी खानदेशात समाज सुधारणा केली. पश्चिम खानदेश जिल्हा खादी मंडळाचे अध्यक्ष असताना श्री. बाळूभाई मेहता, नानासाहेब ठकार, गोपाळराव मदाने यांच्या समवेत मालपूर, कासारा, पिंपळनेर या भागात खादीप्रचार करून, सभांतून खादीचे महत्त्व पटवून दिले. कर्मवीर दादासाहेब, डॉ. दादासाहेब घोगरे यांच्या सहकार्याने 'आदि हिंदू सेवा मंडळ' स्थापन करून (१९२१) हरिजन सेवा कार्याला व्यापक प्रमाणावर सुरूवात केली. स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव मिटवण्यासाठी त्यांनी स्पृश्य समजले जाणाऱ्या कुटुंबांसोबत सहभोजनाचे कार्य सुरू केले. महात्मा गांधींच्या उपोषणानंतर देशभर अस्पृश्यता निवारण कार्य सुरू झाले. यातून १९३२ मध्ये 'हरिजन सेवक संघ' स्थापन होऊन, काकासाहेब या देशव्यापी संघटनेत मुंबई प्रांतात सक्रिय राहिले. अस्पृश्योद्धारासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. गावोगावी अस्पृश्यावरील बहिष्कार प्रसंगी सवर्णांना आपली भूमिका पटवून देऊन या कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. दरवर्षी २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या नऊ दिवसात 'हरिजन नवाह' साजरा होत असतांना हरिजन उन्नतीला पूरक आणि अस्पृश्यता निवारणाला अनुकूल असे उपक्रम राबविलेत. पूर्व-पश्चिम खानदेशात दौरे काढून तेथील कार्यकर्त्यांच्या मदतीने हे उपक्रम चालविले. दलित मंदिर प्रवेश मोहिम चालविली. साने गुरुजींच्या सोबत यासाठी पुढाकार घेतला. पंढरपूर सत्याग्रहातही सहभागी झालेत. अतिशय संयमी आणि विवेकी भूमिकेने सुधारणा कार्याला वाहून घेऊन नानासाहेब शंकरराव ठकार यांच्या पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळात आदिवासींच्या उन्नतीसाठी योगदान दिले. भंगी-मुक्तीसाठी काकासाहेबांनी पूर्व-पश्चिम खानदेशात अनेक उपक्रम राबविलेत. भंगी समाजाचे जीवनमान सुधारण्यासाठी काकासाहेब बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली १९५० साली महाराष्ट्र सरकारने एक समिती नेमली. या समितीने महाराष्ट्रातील भंगी कामगारांच्या जीवनमानाच्या उन्नतीसाठी उपयुक्त शिफारसी केल्यात. या सुधारणेचे श्रेय काकासाहेबांना दिले जाते. त्यांना 'सार्वजनिक आरोग्याचे आधारस्तंभ (Masters of Public Health) म्हणून आरोग्यमंत्री मा. डी. डी. गिल्डर यांनी उपमा दिली. 'दलित सेवा' आणि 'उद्धारासाठी', 'दलित सेवक' पाक्षिक चालवून हरिजनांच्या व्यथांबद्दल पोटतिडकीने लिहिले. गांधीवादी मार्गाने आपले कार्य सुरू ठेवले, धर्मानुष्ठान, यज्ञ आणि होमहवनातून अन्नधान्य, पैसा इत्यादीची नासाडी करणाऱ्यांबद्दल परखडपणे टीका केली. जातीभेद नष्ट होऊन समता् कशी प्रस्थापित होईल, यासाठी त्यांची धडपड राहिली. धर्माची, जाति व्यवस्थेची परखडपणे मीमांसा केली. असंख्य सहकारी जोडलेत. राजेंद्र छात्रालयाच्या उभारणीत लक्ष घालून विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी त्यांची तळमळ राहिली. कामगार, महिला वर्गाच्या हितासाठी आपली भूमिका विधायकपणे मांडली. महात्मा गांधी व विनोबाजींच्या प्रेरणा काकासाहेबांना असल्याने 'सेवा' हा धर्म मानला. या त्यांच्या कार्याबद्दल महाराष्ट्राने त्यांच्या कार्याचा गौरव केला. महाराष्ट्र विशेषतः खानदेशच्या सामाजिक इतिहासात काकासाहेब बर्वेंच्या कार्याचा भाग मोठा दिसून येतो.




**अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर उपाख्य ठक्कर बाप्पा-**
**अमृतलाल ठक्कर यांनी**

गुजरातमधील पंचमहाल जिल्ह्यातील आदिवासी भिल्लांच्या दयनीय स्थितीचा अनुभव घेऊन, अनेक घटकांकडून आदिवासींची होत असलेली पिळवणूक थांबवण्यासाठी आयुष्यभर आदिवासी-दलितांच्या उन्नतीसाठी कार्य केले. १९२३ मध्ये पंचमहाल भागात 'अंत्यज मंडळे' स्थापन करून भंगीसाठी धर्मशाळा उभारून दारुबंदीचा आग्रह धरला. अस्पृश्य व आदिवासींच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी मुंबई प्रांत सरकारने १९२८ मध्ये मि. ओ. एच. बी. स्टार्ट यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली होती, तीचे श्री. ठक्करबाप्पा सदस्य होते. १९३२ साली ते अ.भा. हरिजन सेवक संघाचे मुख्य कार्यवाह बनले. पूर्व, पश्चिम खानदेशासह २०० जिल्ह्यांतून हरिजन सेवक संघाच्या शाखा सुरू करून, अस्पृश्यांच्या उद्धारासाठी विविध उपक्रम राबविलेत. भारत सेवक समाजापासून प्रेरणा घेऊन आयुष्यभर श्री. ठक्कर बाप्पा यांनी आदिवासी, दलितांसाठी, शाळा, दवाखाने आणि सहाय्यकारी संस्था उभ्या केल्या. त्यांच्याच प्रेरणेने पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळाची स्थापना पश्चिम खानदेशात झाली. रविशंकर महाराज आणि ठक्कर बाप्पा ही गुजरातची दैवते मानली जात होती. या दोघांची जन्मभूमी गुजरात असली तरी, खानदेशातील आदिवासी दलितांसाठी त्यांनी खूप मोठे काम केले आहे. म्हणूनच दोघेही खानदेशातील आदिवासी, दलित समाजाची श्रद्धास्थाने बनली. खानदेशातील असंख्य सेवाभावी कार्यकर्ते ठक्कर बाप्पांच्या संपर्कात होते. १९३९ मधील ठक्कर बाप्पांच्या ७१ (एकात्तराव्या) जन्मदिवसानिमित्त खानदेशातील कार्यकर्त्यांनी बराच निधी उपलब्ध करून दिला होता. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदेंच्या कार्याचाही प्रभाव त्यांच्या जीवनावर होता. हरिजन सेवक संघाच्या कार्यात महात्मा गांधींच्या आग्रहावरुन ते सक्रिय झालेत. आजन्म हरिजन सेवक म्हणून त्यांनी आपले सेवा कार्य सुरू ठेवले.

**श्री.शंकर विनायक ठकार उपाख्य भिल्ल सेवक नानासाहेब ठकार-**

पश्चिम खानदेशात गांधीवादी कार्यकर्ते आणि भिल्लसेवक नानासाहेब ठकार भिल्लांच्या उन्नतीसाठी वाहून घेऊन आदिवासींना त्याच्या अस्मीतेची जाणीव करून दिली. राष्ट्रीय शिक्षण प्रसार, खादी प्रचार, यातून स्वावलंबनाची शिकवणूक आणि ग्रामीण विकासासाठी पुढाकार घेऊन नानासाहेब ठकार यांनी पश्चिम खानदेशात गावोगावी भेटी दिल्यात. स्वदेशी, खादी, मद्यपान बंदी, ग्राम संघटना, शिक्षण, सामाजिक चालीरीती या विषयावर व्याख्याने देऊन लोकांमध्ये जागृती घडवून आणली. आपल्या धर्मपतकी सौ. पार्वतीबाई ठकार यांच्यासोबत सूत कातणे, पिंजणे शिकून प. खानदेशात ठिकठिकाणी कार्यकर्त्यांच्या मदतीने सेवाकार्य चालविले. गावगुंडी, हिंदू-मुस्लीम बेबनाव या विरोधात लोकांचे प्रबोधन घडवून आणून भिल्लांची स्थिती सुधारण्यासाठी परिश्रम घेतलेत. श्री. शंकर श्रीकृष्ण देव, आप्पासाहेब रणदिवे, काकासाहेब बर्वे, श्री. शालीग्रामजी भारतीया, बाळूभाई मेहता, रामेश्वरजी पोद्दार या सहकाऱ्यांच्या बरोबर पश्चिम खानदेश दौरा केला. महात्मा गांधींच्या आमंत्रणावरून नानासाहेब देव, बाळूभाई मेहता आणि काकासाहेब बर्वे यांच्यासह साबरमती आश्रमास भेट देऊन गांधीजींच्या प्रेरणेने ग्रामीण आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी वाहून घेतले, सवाई मुकटी येथे 'समर्थ उद्योग मंदिर' स्थापन करून गावकऱ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. सवाई मुकटी हे मार्गदर्शन केंद्र बनले. हरिजन मंडळीला रोजगार मिळाला. गांधी सेवा संघात सक्रिय राहून नानासाहेब ठकार यांनी भिल्लांची उन्नती घडवून आणण्यासाठी वाहून घेतले. १९३८ मध्ये पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळाची स्थापना करून यात काकासाहेब बर्वे, बाळूभाई मेहता, त्रिकमलाल सराफ, श्री. गबाशेठ, लक्ष्मणदास शहा असे असंख्य कार्यकर्ते जोडले. पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळाच्या माध्यमाने आदिवासींना शिक्षणासाठी प्रवृत्त केले. मद्यपानाच्या व्यसनापासून करण्याचा प्रयतक केला. शिक्षणसंस्था उभारून मुला-मुलींना वसतिगृहात ठेवून स्वतःच्या पायावर कसे उभे राहता येईल असे शिक्षण दिले. आदिवासी तालुक्यातून भिल्ल समाजाच्या जागृतीसाठी दौरे काढले. ठक्कर बाप्पा आणि महात्मा गांधीच्या प्रेरणेने सेवा कार्यात झोकून दिले. आदिवासींच्या सुख-दुःखाशी समरस होत असताना मसूद, गॅलाघर यासारख्या पश्चिम खानदेश जिल्ह्यातील पक्षपाती कलेक्टर तथा सनदी नोकरांशी संघर्ष देखील केला. आदिवासींमध्ये जागृती निर्माण केली.

क्रमशः...




# इन्कम टॅक्स रिटर्न भरताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी?

आजच्या वेगवान आणि पूर्णपणे डिजिटल होत चाललेल्या आर्थिक जगात प्रत्येक व्यक्तीचे आर्थिक व्यवहार हे थेट सरकारी यंत्रणांच्या नजरेत असतात. तुम्ही नोकरी करणारे कर्मचारी असाल, व्यापारी असाल, डॉक्टर, वकील, स्वतंत्र व्यवसाय करणारे, गुंतवणूकदार किंवा छोटा व्यवसाय करणारे असाल तुमच्या बँक खात्यातील व्यवहार, मुदत ठेवींवरील व्याज, शेअर बाजारातील गुंतवणूक, मालमत्ता खरेदी-विक्री, ऑनलाईन व्यवहार आणि कर कपातीची माहिती शासनाकडे विविध माध्यमांतून पोहोचत असते. त्यामुळे आपली माहिती शासनापर्यंत पोहोचत नाही ही पूर्वीची समज आता पूर्णपणे चुकीची ठरली आहे. अशा परिस्थितीत प्राप्तिकर विवरणपत्र भरणे हे केवळ कायदेशीर कर्तव्य मानले जात नसून, ते व्यक्तीच्या आर्थिक शिस्तीचे आणि प्रामाणिकपणाचे प्रतीक मानले जाते.

असं म्हणतात की डॉक्टर आणि वकिलांपासून काहीच लपवायचं नसतं, कारण योग्य उपचार आणि योग्य सल्ला मिळण्यासाठी खरी आणि संपूर्ण माहिती देणे अत्यंत आवश्यक असते. अगदी त्याचप्रमाणे प्राप्तिकर विवरणपत्र भरताना सुद्धा आपल्या (सी ए) सनदी लेखापालापासून कोणतीही आर्थिक माहिती लपवू नये. अनेक वेळा लोक हे छोटंसं उत्पन्न आहे, हा व्यवहार सांगायची गरज नाही, हा रोखीचा व्यवहार कुणाला कळणार नाही अशा समजुतीत काही माहिती लपवतात. परंतु आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात प्राप्तिकर विभागाकडे वार्षिक आर्थिक माहितीपत्रक, कर कपात तपशीलपत्र, बँक व्यवहार, मालमत्ता व्यवहार, शेअर बाजारातील व्यवहार, वस्तू व सेवा कराशी संबंधित माहिती आणि मोठ्या आर्थिक व्यवहारांचा संपूर्ण तपशील उपलब्ध असतो. त्यामुळे लपवलेली माहिती भविष्यात नोटीस, दंड किंवा चौकशीचे कारण बनू शकते. योग्य आणि सुरक्षित आयकर विवरणपत्र भरण्यासाठी आपल्या (सी ए) सनदी लेखापालाला सर्व व्यवहार, उत्पन्न, गुंतवणूक आणि आर्थिक माहिती स्पष्टपणे सांगणे अत्यंत गरजेचे आहे.

इन्कम टॅक्स रिटर्न (आयकर विवरणपत्र) हा असा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे ज्याद्वारे करदाता आयकर विभागाला आपल्या वार्षिक उत्पन्नाची, मालमत्तेची, गुंतवणुकीची, कर सवलतीची आणि इतर आर्थिक व्यवहारांची माहिती सादर करतो. यामध्ये पगार, व्यवसाय उत्पन्न, भाडे उत्पन्न, व्याज, शेअर्स व गुंतवणूक मधील नफा, तसेच विविध कर बचत गुंतवणुकींचा समावेश असतो. हे विवरणपत्र प्रत्येक आर्थिक वर्ष संपल्यानंतर भरले जाते. प्राप्तिकर कायद्यानुसार, ज्या व्यक्तीचे उत्पन्न निर्धारित मूलभूत सूट मर्यादेपेक्षा जास्त आहे अशा प्रत्येक व्यक्तीस आयकर विवरणपत्र भरणे बंधनकारक आहे.

मात्र प्रत्यक्षात आजही अनेकांकडून इन्कम टॅक्स रिटर्न कडे केवळ कर भरण्याची औपचारिक प्रक्रिया म्हणून पाहिले जाते. परंतु वास्तव पाहता, आयकर विवरणपत्र हे व्यक्तीच्या आर्थिक व्यवहारांची विश्वासार्ह नोंद मानले जाते. गृहकर्ज किंवा व्यवसायासाठी कर्ज घेताना, परदेश प्रवासासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करताना, शासकीय निविदांमध्ये सहभाग घेताना, मोठी आर्थिक गुंतवणूक करताना किंवा स्वतःची आर्थिक क्षमता सिद्ध करताना आयकर विवरणपत्राला विशेष महत्त्व दिले जाते. अनेक वेळा पुरेशा उत्पन्न असूनही योग्य विवरणपत्र उपलब्ध नसल्यामुळे व्यक्तींना विविध आर्थिक आणि प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागतो. याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आज आयकर विभागाकडे अत्याधुनिक माहिती प्रणाली उपलब्ध असल्यामुळे चुकीची माहिती देणे, उत्पन्न लपवणे किंवा चुकीच्या कर सवलती घेणे भविष्यात मोठ्या अडचणी निर्माण करू शकते. अनेक वेळा थोडासा कर वाचवण्याच्या प्रयतकात लोक स्वतःलाच आर्थिक आणि कायदेशीर संकटात ढकलतात. म्हणूनच इन्कम टॅक्स रिटर्न (आयकर विवरणपत्र) भरताना प्रत्येक गोष्ट समजून, काळजीपूर्वक आणि कायदेशीर नियमांचे पालन करून विवरणपत्र भरणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य अर्ज निवडण्यापासून ते सर्व उत्पन्न अचूक दाखवणे, योग्य कर सवलती घेणे, सर्व आर्थिक तपशील तपासणे आणि वेळेत पडताळणी करणे या प्रत्येक टप्प्यावर दक्षता घेणे गरजेचे आहे. योग्य पद्धतीने भरलेले प्राप्तिकर विवरणपत्र हे केवळ कायदेशीर पालन नसून, तुमच्या आर्थिक सुरक्षिततेचा




आणि विश्वासार्ह भविष्यासाठीचा एक मजबूत पाया असतो.

खाली आपण प्राप्तिकर विवरणपत्र भरताना कोणत्या महत्त्वाच्या गोष्टींची विशेष काळजी घ्यावी याची सविस्तर माहिती पाहणार आहोत.

१ ) योग्य इन्कम टॅक्स रिटर्न अर्जाची निवड करा

आयकर विवरणपत्र भरताना सर्वप्रथम स्वतः साठी योग्य अर्ज निवडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक करदात्याच्या उत्पन्नाच्या प्रकारानुसार शासनाने वेगवेगळे अर्ज निश्चित केलेले आहेत. पगार, व्यवसाय, व्यावसायिक सेवा, भांडवली नफा किंवा इतर उत्पन्नाच्या स्वरूपानुसार योग्य अर्ज निवडल्यास इन्कम टॅक्स रिटर्न अचूक आणि नियमांनुसार भरता येते. त्यामुळे अर्ज निवडण्यापूर्वी आपल्या उत्पन्नाचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

२ ) इन्कम टॅक्स रिटर्न ची वेळेत पडताळणी करा

इन्कम टॅक्स रिटर्न भरल्यानंतर त्याची पडताळणी करणे ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. विवरणपत्र भरल्यानंतर निर्धारित कालावधीत आधार क्रमांकावरील (ओ.टी.पी.) संकेतांकाद्वारे किंवा स्वाक्षरी केलेले पडताळणी पत्र पाठवून ही प्रक्रिया पूर्ण करता येते. वेळेत पडताळणी केल्यास इन्कम टॅक्स रिटर्न वैध मानले जाते आणि पुढील अडचणी टाळता येतात. त्यामुळे (ओ.टी.पी.) द्वारे इन्कम टॅक्स रिटर्न भरल्यानंतर पडताळणी पूर्ण झाली आहे याची खात्री अवश्य करावी.

३ ) सर्व बँक खाती आणि उत्पन्नाचे स्रोत अचूकपणे दाखवा

इन्कम टॅक्स रिटर्न भरताना आपल्या सर्व उत्पन्न स्रोतांची माहिती स्पष्टपणे देणे आवश्यक आहे. पगाराव्यतिरिक्त बँक व्याज, घरभाडे, शेती उत्पन्न, लाभांश, शेअर बाजारातील नफा किंवा इतर कोणतेही उत्पन्न असल्यास ते देखील इन्कम टॅक्स रिटर्न मध्ये नमूद करावे. सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शकपणे दाखवल्यास भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अडचणी किंवा नोटिसा टाळता येतात.

४ ) करसवलती आणि कपातींचा योग्य पद्धतीने लाभ घ्या

आयकर कायद्यानुसार विविध गुंतवणुकी आणि खर्चांवर करसवलती उपलब्ध आहेत. जीवन विमा, भविष्य निर्वाह निधी, वैद्यकीय विमा, गृहकर्जावरील व्याज, शिक्षण शुल्क यांसारख्या गुंतवणुकींवर योग्य कपात मिळू शकते. मात्र या सवलती घेताना संबंधित नियम, अटी आणि मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे. योग्य प्रकारे करसवलतींचा लाभ घेतल्यास कायदेशीररीत्या करबचत करता येते.

५ ) लहान मुलांच्या उत्पन्नाची योग्य नोंद करा

काही परिस्थितींमध्ये लहान मुलांच्या नावावरील उत्पन्न हे पालकांच्या उत्पन्नामध्ये समाविष्ट करावे लागते. मुलांच्या नावावरील व्याज, गुंतवणूक नफा किंवा इतर उत्पन्नाची योग्य माहिती आयकर विवरणपत्रात समाविष्ट केल्यास इन्कम टॅक्स रिटर्न अधिक अचूक आणि नियमांनुसार राहते. त्यामुळे कुटुंबातील सर्व आर्थिक व्यवहारांचा योग्य विचार करणे आवश्यक आहे.


६ ) कर कपात तपशीलपत्र आणि वार्षिक माहिती विवरणपत्राशी माहिती जुळवा

इन्कम टॅक्स रिटर्न अंतिम करण्यापूर्वी (26 AS) कर कपात तपशीलपत्र आणि (AIS-TIS) वार्षिक माहिती विवरणपत्रातील माहिती तपासून घेणे अत्यंत आवश्यक आहे. या अहवालांमध्ये कर कपात, व्याज उत्पन्न, मोठे आर्थिक व्यवहार आणि इतर आर्थिक नोंदींचा तपशील असतो. विवरणपत्रातील माहिती या नोंदींशी जुळत असल्यास विवरणपत्र अधिक विश्वासार्ह आणि अचूक ठरते तसेच भविष्यातील चौकशी किंवा अडचणी टाळता येतात.

७ ) जुनी आणि नवीन करपद्धती समजून निवड करा

इन्कम टॅक्स रिटर्न भरताना जुनी करपद्धती आणि नवीन करपद्धती यापैकी योग्य पर्याय निवडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक करदात्याचे उत्पन्न, गुंतवणूक, गृहकर्ज, विमा, वैद्यकीय विमा, शिक्षण शुल्क आणि इतर करसवलती यांचा विचार करून कोणत्या करपद्धतीत कमी कर भरावा लागेल हे तपासावे. ज्या व्यक्तींनी करबचतीसाठी गुंतवणूक केली आहे किंवा गृहकर्ज, विमा, भविष्य निर्वाह निधी यांसारख्या सवलती उपलब्ध आहेत, त्यांच्यासाठी जुनी करपद्धती फायदेशीर ठरू शकते. तर ज्यांच्याकडे करसवलती कमी आहेत, त्यांच्यासाठी नवीन करपद्धती सोपी आणि लाभदायक ठरू शकते. त्यामुळे घाईघाईने पर्याय निवडण्याऐवजी दोन्ही करपद्धतींची तुलना करूनच योग्य निर्णय घ्यावा.

इन्कम टॅक्स रिटर्न भरणे म्हणजे फक्त कर भरायची प्रक्रिया नसून, आपल्या आर्थिक व्यवहारांची योग्य आणि स्पष्ट माहिती शासनाला देण्याची एक जबाबदारी आहे. वर्षभरात आपण किती कमाई केली, कुठे गुंतवणूक केली, किती कर भरला आणि कोणत्या सवलती घेतल्या याची संपूर्ण माहिती या इन्कम टॅक्स रिटर्न तून दिली जाते. त्यामुळे हे विवरणपत्र भरताना कोणतीही घाई न करता सर्व माहिती नीट तपासून देणे आवश्यक आहे.




# चैतन्य-चिन्मय : निरागस वाढदिवसांचा प्रवास


घरात सकाळ आता थोडी वेगळीच उगवू लागली होती. पहाटेच्या शांततेत दोन छोट्या पावलांचा आवाज मिसळू लागला होता. कधी खेळण्यांचा पसारा, कधी निरागस हसू, तर कधी आजोबा आजी अशी गोड हाक चैतन्य आणि चिन्मयमुळे घरात रोज नव्या आनंदाची चाहूल लागायची.

त्यांच्या खोडकर डोळ्यांत सतत नवं जग दडलेलं असायचं. एका क्षणी ते भांडायचे, तर दुसऱ्याच क्षणी एकमेकांना मिठी मारून हसायचे. घरातील प्रत्येक वस्तू त्यांच्यासाठी खेळणं होती आणि प्रत्येक दिवस नव्या साहसासारखा.

आजकाल वाढदिवस म्हटलं की मोठे हॉल, चमचमणारी सजावट, डीजे, फोटो आणि गोंधळ हे सगळं आलंच. पण त्यांच्या आईने आणि आजीने एक वेगळाच विचार मनात जपला.

त्या म्हणाल्या, लहानपणीचा वाढदिवस म्हणजे केवळ मोठा सोहळा नसतो. तो शांत, सुंदर आणि आठवणीत राहणारा क्षण असावा.

मग ठरलं पहिली पाच वर्षं वाढदिवस एखाद्या पवित्र ठिकाणी जाऊन, देवदर्शन करून आणि कुटुंबासोबत निवांत वेळ घालवत साजरे करायचे.




पहिलं वर्ष शिर्डीचा सुगंध

त्यांच्या पहिल्या वाढदिवसाला आम्ही शिर्डीला गेलो.

सकाळच्या मंद वाऱ्यात अगरबत्तीचा सुगंध दरवळत होता. मंदिरातील घंटांचा आवाज वातावरणभर पसरला होता.

चैतन्य माझ्या खांद्यावर डोकं ठेवून शांतपणे आजूबाजूला पाहत होता. गाभाऱ्यातील प्रकाश त्याच्या डोळ्यांत चमकत होता.

चिन्मय मात्र आजीच्या कुशीत घट्ट शिरला होता. तो मंदिरातील दिव्यांकडे मोठ्या कुतूहलाने पाहत होता. कधी एखाद्या घंटेकडे बोट दाखवायचा, तर कधी समोरून जाणाऱ्या लोकांकडे पाहून हसायचा.

त्या दिवशी फार काही बोलणं झालं नाही. पण त्या शांततेतही एक वेगळाच आनंद होता.

दुसरं वर्ष त्र्यंबकेश्वरची पायवाट

दुसऱ्या वर्षी आम्ही त्र्यंबकेश्वरला गेलो.

आता दोघं छोट्या छोट्या पावलांनी चालू लागली होती. मंदिराच्या पायऱ्यांवर ते हातात हात घालून टुणटुण चालत होते.

चैतन्यने वरच्या घंटेकडे पाहून अचानक टणण! असा आवाज काढला आणि सगळे हसू लागलो.

चिन्मयने दोन्ही हात वर करून जणू आरतीच म्हणायला सुरुवात केली. त्याच्या चेहऱ्यावरचं निरागस भाव पाहून आजी बराच वेळ त्याच्याकडे पाहत राहिली.

मंदिराबाहेर कबुतरांच्या मागे धावताना दोघांचा आनंद ओसंडून वाहत होता. कधी एका दगडावर बसायचे, तर कधी पुन्हा उठून पळायला लागायचे.

त्या छोट्या पावलांनी संपूर्ण प्रवास आनंदाने भरून गेला होता.

तिसरं वर्ष जेजुरीचा सोनसळी दिवस

तिसऱ्या वाढदिवसाला आम्ही जेजुरीला गेलो.

गडावर चढताना दोघांचाही उत्साह पाहण्यासारखा होता. आजूबाजूला उधळली जाणारी हळद, यळकोट यळकोटचा जयघोष आणि भक्तांच्या चेहऱ्यावरचा आनंद सगळंच रंगून गेलं होतं.

चैतन्यने अचानक माझ्या कपाळावर हळदीचा छोटासा ठिपका लावला. तो स्वतःच हसू लागला.

चिन्मयने आजीच्या गालावर आपला छोटासा हात ठेवला. त्या क्षणी आजीच्या डोळ्यांत हलकासा पाण्याचा थेंब चमकला.

ती काही बोलली नाही. फक्त दोघांना जवळ घेत त्यांच्या केसांवरून अलगद हात फिरवत राहिली.

चौथं वर्ष शेगावची ओढ

चौथ्या वर्षी शेगावच्या यात्रेची तयारी सुरू झाली.

आता दोघांचे शब्द स्पष्ट ऐकू येऊ लागले होते.

आजी आजोबा केक हवा गाडीमध्ये बसायचं

त्यांच्या प्रत्येक वाक्यात गोडवा होता.

प्रवासात ते खिडकीतून बाहेर पाहत राहायचे. रस्त्यावरची झाडं, ढग, गाई, ट्रॅक्टर सगळ्याबद्दल प्रश्न विचारायचे.

शेगावच्या मंदिरात गेल्यावर दोघं काही वेळ अगदी शांत झाले. जणू देवाशीच काहीतरी हळूच बोलत होते.

पाचवं वर्ष मोठ्या आनंदाची चाहूल

आता सगळ्यांना त्यांच्या पाचव्या वाढदिवसाची उत्सुकता लागली आहे.

कारण यावेळी ठरलं आहे दोघांच्या मनासारखा मोठा वाढदिवस साजरा करायचा.

मोठ्ठा केक, रंगीबेरंगी फुगे, त्यांच्या आवडीची गाणी आणि भरपूर खेळ.

कारण केक म्हणजे दोघांचा जीव की प्राण!

दर दोन दिवसांनी एक तरी आवाज यायचाच आजोबा केक आणा ना!


आणि मग आजोबा मुद्दाम विचारायचे, इतका मोठा? दोघं हात पसरून म्हणायचे, नाही अजून मोठा!

घरभर हशा पिकायचा.

आजही त्या वाढदिवसांच्या आठवणी मनात आल्या की मंदिरातील घंटानाद, प्रवासातील गप्पा, छोट्या पावलांचा आवाज आणि त्या दोघांचं निरागस हास्य पुन्हा जिवंत होतं.

आणि त्या छोट्या छोट्या क्षणांनीच घराला खरं घरपण दिलं आहे

# शब्दझुला



## गुलमोहर !

ग्रीष्म दाह भार उन्हाळा
धरणीवरी अवकळा !.....
पानोपानी झिरमिर त्या
गुलमोहर अग्नीकळ्या !.....
नदीकाठी पायरोवून
उभा एकटा वाट पाही !....
येता जाता वेचूनी घेई
प्रितसुगंध मनमोही !....
ये गं सई घेऊ हिंदोळा
झडती फूले अंगावरी !.....
लालबुंद पाचपाकळ्या
स्त्रीकेशराग्र शिरेधरी !.....
पायवाट वेडीवाकडी
ऊन सावली खेळतसे !.....
वाटसरू घेतविसावा
शांतशितल नेत्रसुखे !......
फ्लेम ट्री तू इंग्रजीतला
गुलमोहर बहरला !....
पानोपानी लाल पिवळा
मज गालीचा गवसला !.....
सुवासिक नसली पुष्पे
पाय पाकळ्या शोभिवंत !.....
ऊनवारा सोसुन उभा
सदाबहार मूर्तीमंत !.....
लावण्याची येई सारिका
करिती गोष्टी तुझ्यासवे !......
साक्षतूझी वचन तिचे
उगाच का रे हेवेदावे !....

– अशोकधनु तोरवणे, (पुणे-साक्री)

## चिमणी साठी घरटे


शोधीत फिरते चिमणी
आसरा दारात
पण चिमणीसाठी नाही
घरटे घरात
कधी काळी होता तिचा
हक्काचा कोपरा
कधी फोटो मागे, कधी
पंख्या वर आसरा
ना धान्य अंगणात,
ना पाण्याचे माठ
आधुनिकतेने अडवली
तिची वाट
तिचे चिवचिवणे वाटू
लागलेय गोंगाट
चिमणीसाठी आता
नाही घरटे घरात
एक विनंती सर्वांना..
चला पुन्हा एकदा
थोडे उदार होऊया
गॅलरीच्या एका कोपऱ्यात
छोटेसे घरटे देऊया
थोडे पाणी, थोडे
दाणे तिथे ठेवूया
आपल्या हरवलेल्या
चिमूताईला परत आणूया!

– प्रशांत सहस्त्रबुद्धे,
मो.८७७९२९८१६१

## योजना

अशी योजना आखली पाहिजे
खरी बातमी छापली पाहिजे
सखे द्यायची तर जखम दे अशी
मला मखमली वाटली पाहिजे
नको ऐकवू सारखे तू तिला
तिची पण व्यथा ऐकली पाहिजे
गझल ऐकवू वाटते आज ही
मला फक्त ती भेटली पाहिजे
उभा जन्म राहील बिलगत तिला
उन्हासारखी सावली पाहिजे
मला वाटते लाड पुरवू तिचे
असू दे जखम, आपली पाहिजे
नको सारखी पण कधी ना
कधी
तिची आठवण काढली पाहिजे
मला वासरू व्हायचे एकदा
मला वेदना चाटली पाहिजे
तुला आसवे फक्त पर्याय मग
नदी फक्त ही आटली पाहिजे

– सत्तू भांडेकर, गडचिरोली



## जलतारा

येता पावसाचे पाणी
वाहून जाते वाया
मुरणार ते भूगर्भी
जलतारा खोदल्यावर
कोरड्या विहिरींनाही
येईल पुन्हा तराणा,
झरे पुन्हा उमटतील
जलतारा खोदल्यावर
शेतात हिरवी स्वप्ने
पुन्हा रुजून येतील,
बळीराजा हसेल पुन्हा
जलतारा खोदल्यावर
टँकरवरील अवलंबित्व
सरतील गाव सारे,
स्वाभिमान जागा होईल
जलतारा खोदल्यावर
राहील ना तहानेचा
इतिहास या मातीला,
नवं युग जन्म घेईल
जलतारा खोदल्यावर

– जयराम मोरे, सोनगीर
मो. ७७०९५६५९५७

## मधुरमकरंद

पाहता सख्या भारावलो
सुरुपात तुझ्यात गुंतलो
नयनात तुझी सावली
सर्वत्र शोधित राहिलो
अवती भवती तूच तू
हृदयी साठवीत गेलो
सुगंध तुझा त्रिभुवनी
मनी दरवळत राहिलो
चैतन्य सारे अमृताचे
तृप्त प्राशित राहिलो
अवीट मधुरमकरंदी
मी मुक्त विर्घळून गेलो
नभ तुझे निळेसावळे
मी पांघरीत आलो
षड्रिपू ना मज शिवले
भक्ती रंगात मी दंगलो
सत्यात विश्वेश्वराच्या
तुला न्याहळु लागलो

– वि.ग.सातपुते

# गड-किल्ल्यांवरील आदर्श शासनव्यवस्था

(पान ३ वरुन) लष्करचे सरदाराचे भावबंदांना अथवा त्याचे निसपत लोक त्यांस परिच्छिन्न किल्ल्याचा मामल सांगू नये. तसेंच एका घराचे भाऊबंद एक, दोन, तीन आहेत आणि इतकेही गडवई तर त्यांस किल्लेचे मामले अवश्यमेव सांगावेच लागतात. काय निमित्य की, किल्ल्याचे कामास माणूस मिळणें परम कठीण आहे परंतु त्यास समीप किल्ल्यांवर न ठेवावे.;

**बदलीची सेवा-** छत्रपतींनी गड-किल्ल्यावर एकच अधिकारी कायम ठेवला नाही. बदलीची सेवा हे तत्व आमलात आणले. हवालदार तीन वर्षांनी, तटसरनौबत चार वर्षांनी, सबनीस व कारखानीस पाच वर्षांनी बदलला जात असे.जगामध्ये आजही अशी सेवा देण्याची पध्दत सुरू आहे. त्यामुळे गड-किल्ल्यावरील व्यवस्था नेहमी कार्यक्षम व तत्पर राहत असे. हे छत्रपतींच्या दुर्गनीतीचे खास वैशिष्ट्य होय. छत्रपतींच्या स्वराज्यात हिरोजी इंदुलकर, मोरोपंत पिंगळे, अर्जीजी यादव हे स्थापत्य विशारद होते. अँबे करे या फ्रेंच प्रवाशाने छत्रपतींच्या गड-किल्ल्यांवरील शासनव्यवस्थेची स्तुती केली आहे. छत्रपतींची दुर्ग बांधणीची कला सर्वश्रेष्ठ आहे असे म्हटले आहे.या प्रवाशाने पुढे म्हटले आहे की ३९;छत्रपती शिवाजी महाराजांना महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती पूर्णपणे माहित होती. इथले झाड, झाडोरे, नद्या, नाले, कडे, कपारी, गडकोट, घाटवाटा आदि. ची बारीक-सारीक माहिती त्यांना होती. त्यांनी या भागाचे नकाशे काढले होते. त्यानुसार महाराष्ट्राच्या डोगर-कपारीत अभेद्य असे गड-किल्ले छत्रपतींनी उभा केले. सहयाद्रीच्या मदतीने उभा केलेल्या गड-किल्ल्याच्या माध्यमातून छत्रपतींची दुर्गदृष्टी किती व्यापक होती हे दिसुन येते. छत्रपतींनी निर्माण केलेल्या गड, कोट, किल्ले, दुर्ग, गढ्या अन पाणकोट यांना जगामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. कोणत्याही गड-दुर्गाचा विचार करावयाचा असेल तर त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास विचारात घ्यावाच लागतो. या गड-किल्ल्यांच्या देशात किल्ल्यांचा अचुक व योग्य उपयोग करणारे एकमेव राजे म्हणुन छत्रपतींचे नाव जगामध्ये आदराने घेतले जाते. छापती शिवाजी महाराजांचे दुर्ग व्यवस्थापन अतिशय उच्च कोटीतील होते.हवालदार, सबनीस, कारखानीस हे प्रशासन अधिकारी छत्रपतींच्या नेतृत्वाखाली अतिशय उत्कृष्टपणे शासन चालवत होते. संपूर्ण जगाने अनुकरण करावी अशी शासनव्यवस्थेतील आदर्श तत्वे छत्रपतींच्या दुर्ग व्यवस्थापनात आहेत.

**आरोग्यम् धनसंपदा**
डॉ.नितीन जाधव
मो.९८९२३०६०९२

# कटिशूल

कटि म्हणजे कंबर व शूल म्हणजे दुखणे. कटिशूलची कारणे भरपूर आहेत ज्यावर आपण नेहमीच दुर्लक्ष करतो. खूप वेळ एकाच जागी बसल्यामुळेही कंबर दुखू शकते. किंवा कंबर जखडल्यामुळे कुठचीही हालचाल करण्यास त्रास होणे सारख्या तक्रारी असू शकतात. हे कंबरेचे दुखणे नंतर पाठीचे दुखणे बनून अजूनही जास्त त्रास देऊ/वाढवू शकते. म्हणूनच एकाच जागी तासनतास बसून काम करणे शक्यतो टाळावे विशेषकरून जे ऑफिसमध्ये काम करतात ते सुद्धा वातानुकुलीत कक्षात बसून; विश्राम न करता कुठचीही गाडी सतत चालवणाऱ्या माणसांना, लांब पल्ल्याच्या मार्गावरून मोठ्या गाड्या चालविणे जसे कि truck किंवा tourist / travel bus ज्या एका राज्यातून दुसऱ्या राज्यात प्रवास करणारे व खडबडीत रस्त्यावरून(गावातले रस्ते पण) भरधाव वेगाने गाड्या चालवणारया Drivers ना हे त्रास नेहमीच होत असतात. व वेळेत काळजी जर घेतली नाही तर हे दुखणे जुनाट होऊन भयंकर त्रासांना जन्म देते. मणके सटकू शकतात. दोन मणक्यांमधील झीज अतिप्रमाणात होऊन असह्य वेदना होऊ शकतात.

आता हे फक्त बसून काम करणाऱ्या व्यक्तींपुरतेच मर्यादित नसून सतत उभे राहणाऱ्या व्यक्तींना सुद्धा लागू होते जसे कि bus conductors, salesmans, डोक्यावर विकायच्या वस्तूंचा भार घेऊन दारोदारी जाऊन विकणारयाना, अगदी भाजीवाले सुद्धा व इतर. जास्त भाराचे (over weight/ overload) वजन उचलल्यामुळे पण कंबर



दुखू शकते. ह्यात construction site वरचे कामगार सुद्धा आले व Gym मध्ये bodybuilding व weightlifting चे डोक्यावर नसते भूत असणारे. Athletes व sportspersons (खेळाडु) सुद्धा ह्याच list मध्ये आले जे Fitness च्या नावावर विश्राम न करता व काळजी न घेता मर्यादेपेक्षा जास्त सराव व व्यायाम करतात. एवढेच नव्हे सर्वात महत्वाचे म्हणजे गृहिणींना तर हा त्रास होताच असतो कारण घर व परिवार सांभाळण्यासाठी सतत उठबस करता करता त्यांचा पूर्ण दिवस घरची कामे करण्यातच निघून जातो व आराम सुद्धा भेटत नाही. एखाद्यावेळेस जर विचित्र स्थिती मध्ये झोपावे लागले, नेहमीप्रमाणे मऊ व comfortable bed न मिळाल्यामुळे(छोट्या जागेत झोपल्यामुळे, Train/bus च्या प्रवासात शक्यतो हे त्रास होतात जेव्हा आपण sitting / semi sleeper मध्ये रात्रीचा प्रवास करतो विशेषकरून ज्यांना असल्या प्रवासाची सवय नसते त्यांना), जमिनीवर झोपावे लागल्याने इतर मुळे ही पाठ दुखू शकते.

ह्या सर्व तक्रारींसाठी मग आपण PainKillers घेतो कुठच्याही वैद्याच्या सल्ल्याशिवाय. थोड्या तासांपुरता त्रास कमी होईल ही पण त्या गोळ्यांचा effect संपल्यावर परत काय? आपण अशेच PainKillers मग घेत राहतो. काय उपयोग त्यांचा? त्यांच्या अतिसेवनामुळे भलतेच त्रास चालू होतात मग. त्यापेक्षा ज्यागोष्टीमुळे हा त्रास होतोय, त्या कमी/बंद करणे महत्वाचे असे नाही का वाटत? शिवाय आहार व विहार सुद्धा व्यवस्थित असले पाहिजेत. शरीरात वात दोष वाढविणारे पदार्थ खाणे, त्या गोष्टींच्या/पदार्थांच्या संपर्कात राहणे, तश्या कृती करणे(विहार) शक्यतो टाळावेत किंवा कमी करावेत. चिकित्सेच्या दृष्टीने सांगायचे झाल्यास आयुर्वेदीय औषधांचा लाभ होतोच पण ती सुद्धा व्याधिचे व्यवस्थित निदान करूनच. एकच औषध सगळ्याच प्रकारच्या व्याधींमध्ये उपयोगी होईलच असे नसते. व्याधिच्या अवस्थेनुसार औषधे व चिकित्सा ही बदलते. पंचकर्म चा विशिष्ठ लाभ होतो. बस्ति चिकित्सा तर ह्या तक्रारींवर सर्वोत्तम. शिवाय सक्हेन-स्वेदन, कटी बस्ति




सारख्या इतर पंचकर्मांचा ही उत्तम फायदा होतो. काही योगासने ह्या दुखण्यांसाठी फायदेशीर ठरतात. म्हणूनच काळजी घ्या स्वतःची व तपासणी करून योग्य वेळेस योग्य उपचार घ्या. Internet वरून स्वतःच्या त्रासांचे निदान करणे थांबवावे. तिथे सगळ्याच गोष्टी सापडू शकत नाहीत.

# निगेटिव्ह लोकांपासून दूर राहणं शक्य नसतं पण त्यांचा प्रभाव आपल्या मनावर होऊ न देणं नक्की शक्य असतं!

आजच्या धावपळीच्या जीवनात आपण प्रत्येकजण मानसिक तणाव, स्पर्धा आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली जगत आहोत. अशा वेळी आपल्या आसपास काही लोक असे असतात जे सतत नकारात्मक विचार, टीका, टोमणे, निराशा किंवा इतरांना कमी लेखण्याची सवय बाळगतात. हे लोक कधी ऑफिसमध्ये भेटतात, कधी मित्रपरिवारात, तर कधी आपल्या स्वतःच्या नात्यांमध्येही असतात.

सुरुवातीला त्यांच्या बोलण्याकडे आपण दुर्लक्ष करतो. पण हळूहळू त्याचा परिणाम आपल्या आत्मविश्वासावर, मानसिक आरोग्यावर आणि आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर होऊ लागतो. अनेक वेळा आपण स्वतःला प्रश्न विचारू लागतो मी खरंच कमी आहे का?, मी काहीच करू शकत नाही का? आणि इथेच मानसिक थकवा सुरू होतो.

मानसशास्त्र सांगते की नकारात्मक लोकांशी सतत संपर्कात राहिल्याने आपल्या मेंदूवर ताण वाढतो. सततच्या नकारात्मक वातावरणामुळे चिंता, राग, नैराश्य आणि निर्णयक्षमता कमी होण्यास सुरुवात होते. त्यामुळे अशा लोकांना बदलण्याचा प्रयतक करण्यापेक्षा स्वतःचं मानसिक संरक्षण करणं अधिक महत्त्वाचं ठरतं. आज आपण अशाच काही प्रभावी मानसशास्त्रीय उपायांबद्दल जाणून घेणार आहोत, जे तुम्हाला निगेटिव्ह लोकांशी व्यवहार करताना मानसिकदृष्ट्या मजबूत ठेवू शकतात.

प्रत्येक गोष्ट मनाला लावून घेऊ नका नकारात्मक लोक अनेकदा स्वतःच्या असुरक्षिततेतून बोलत असतात. त्यांची टीका ही तुमच्या क्षमतेपेक्षा त्यांच्या मानसिक स्थितीचं प्रतिबिंब असते.

उदाहरणार्थ, काही लोक सतत म्हणतात तुझ्याकडून हे होणार नाही. आजकाल स्पर्धा खूप आहे. मोठी स्वप्नं पाहून फायदा नाही. अशा वाक्यांचा परिणाम आपल्या मनावर होतो. पण लक्षात ठेवा प्रत्येकाचं मत हे सत्य नसतं. जर आपण प्रत्येक शब्द मनाला लावून घेत राहिलो, तर आपण स्वतःच्या प्रगतीवरच मर्यादा आणतो.

मानसिक ताकद म्हणजे इतरांच्या मतांपेक्षा स्वतःच्या मूल्यांवर विश्वास ठेवणं.

सीमारेषा आखायला शिका भारतीय समाजात अनेकदा नाही म्हणणं चुकीचं समजलं जातं. पण मानसिक आरोग्यासाठी काही नात्यांमध्ये अंतर ठेवणं आवश्यक असतं.

जर एखादी व्यक्ती सतत तुम्हाला कमी लेखत असेल, तुमचं मन दुखावत असेल किंवा तुमची ऊर्जा संपवत असेल, तर त्या व्यक्तीपासून भावनिक अंतर ठेवणं चुकीचं नाही.

सीमारेषा म्हणजे भांडण नाही.

सीमारेषा म्हणजे स्वतःच्या मनःशांतीचं संरक्षण. आज अनेक लोक सोशल मीडियावरही सतत तुलना, ट्रोलिंग आणि निगेटिव्हिटीचा सामना करत आहेत. प्रत्येक कमेंटला उत्तर देणं आवश्यक नसतं. काही वेळा शांत राहणं हीच सर्वात मोठी ताकद असते.

प्रतिक्रिया देण्याऐवजी प्रतिसाद द्या नकारात्मक लोकांना बहुतेक वेळा भांडण, वाद आणि भावनिक प्रतिक्रिया हवी असते. आपण लगेच रागावलो किंवा वाद घातला, तर परिस्थिती अधिक बिघडते. मानसशास्त्र सांगतं की शांत आणि नियंत्रित प्रतिसाद देणारे लोक मानसिकदृष्ट्या अधिक मजबूत असतात.

उदाहरणार्थ - कोणी तुमच्यावर टीका केली तर लगेच भांडण्यापेक्षा शांतपणे विषय बदलणं, स्मित करणं किंवा आवश्यक असल्यास संभाषण संपवणं हा अधिक शहाणपणाचा मार्ग असतो.

कारण प्रत्येक युद्ध जिंकणं महत्त्वाचं नसतं

काही युद्धांपासून दूर राहणं अधिक महत्त्वाचं असतं.

सकारात्मक लोकांच्या सहवासात राहा

आपल्या आसपासचं वातावरण आपल्या विचारांवर थेट परिणाम करतं. जर आपण सतत नकारात्मक लोकांमध्ये राहिलो, तर नकळत आपणही तसंच विचार करू लागतो.

म्हणून अशा लोकांचा सहवास वाढवा जे

* प्रेरणा देतात
* तुमच्या प्रगतीवर आनंद व्यक्त करतात
* चुका दाखवतात पण अपमान करत नाहीत
* तुमच्या स्वप्नांवर विश्वास ठेवतात

एक सकारात्मक मित्र, चांगलं पुस्तक, प्रेरणादायी संभाषण किंवा कुटुंबातील आधार देणारी व्यक्ती मानसिक आरोग्यासाठी औषधासारखी काम करते.

स्वतःच्या भावनांना ओळखा

अनेक वेळा आपण सतत निगेटिव्ह वातावरणात राहून आपल्या भावनांकडे दुर्लक्ष करतो. पण आतमध्ये ताण, चिंता आणि दुःख साचत जातं.

स्वतःला वेळ द्या. मन मोकळं करा. डायरी लिहा. ध्यान करा. मोबाईलपासून थोडा वेळ दूर राहा. आज मानसिक आरोग्य ही लक्झरी नाही, तर गरज बनली आहे. भारतात अजूनही मानसिक आरोग्याबद्दल उघडपणे बोलण्याची भीती आहे. पण जसं शरीर आजारी पडू शकतं, तसंच मनही थकू शकतं. मदत घेणं ही कमजोरी नसून परिपक्वतेची निशाणी आहे.

स्वतःच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा - नकारात्मक लोक अनेकदा आपल्याला विचलित करतात. ते आपल्या कमतरता दाखवतात, भीती वाढवतात आणि आत्मविश्वास कमी करतात. पण इतिहासात जे लोक यशस्वी झाले, त्यांनी टीकेपेक्षा आपल्या ध्येयावर अधिक लक्ष दिलं.

जर तुम्ही प्रत्येक टीकेला उत्तर देण्यात वेळ घालवला, तर स्वतःची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी वेळ उरणार नाही.

तुमचं ध्येय स्पष्ट ठेवा. स्वतःची प्रगती मोजा.

इतरांच्या मतांपेक्षा स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवा. कारण शेवटी लोकांचं बोलणं कधीच थांबत नाही, पण तुमची वाटचाल थांबता कामा नये. समाजासाठी मोठा संदेश

आज सोशल मीडिया, स्पर्धा, आर्थिक ताण आणि बदलती जीवनशैली यामुळे लोक मानसिकदृष्ट्या अधिक संवेदनशील झाले आहेत. अशा काळात एकमेकांना खाली खेचण्यापेक्षा आधार देणं अधिक गरजेचं आहे.

आपल्या एका वाक्यामुळे कोणाचं मनोबल वाढू शकतं आणि एका वाक्यामुळे एखादी व्यक्ती पूर्णपणे तुटूही शकते. म्हणून टीका करण्यापूर्वी विचार करा.

कोणाचं मन दुखावण्यापेक्षा त्याला उभं करण्याचा प्रयतक करा.

कारण सकारात्मक समाजाची सुरुवात सकारात्मक संवादातूनच होते.

निष्कर्ष - निगेटिव्ह लोक आयुष्यात कायम भेटणार. त्यांना पूर्णपणे टाळणं शक्य नाही. पण त्यांच्यामुळे स्वतःची मानसिक शांती गमावणं टाळता येऊ शकतं.

स्वतःवर विश्वास ठेवा. सीमारेषा आखा. शांत राहायला शिका. सकारात्मक वातावरण निवडा. आणि सर्वात महत्त्वाचं

स्वतःच्या मनाची काळजी घ्या. कारण आयुष्यातील सर्वात महत्त्वाचं नातं हे स्वतःसोबतचं असतं




**मेष :** हा सप्ताह तुमच्यासाठी काही प्रमाणात मागे येण्याचा असणार आहे. एक प्रकारे माघार घ्यावी लागेल. तुम्हाला हवे तसे घडणार नाही. अपेक्षित यश मिळण्यात काहीतरी कमतरता राहील. तडजोड करावी लागेल. पण हे करत असताना कोणाची तरी चांगली साथ मिळू शकते. प्रयतक करुन प्रगती होईल. प्रवास घडू शकतो. स्थलांतर होऊ शकते. या आठवड्यात तुम्हाला शांतपणे काम करण्याची गरज आहे. तुम्हाला तुमच्या शब्दांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. मध्यम मार्ग निवडा. थोडा वेळ शांत बसून आत्मचिंतन करा!

**वृषभ :** हा सप्ताह तुमच्यासाठी अधिकाराचा आणि वर्चस्वाचा असणार आहे. तुम्ही करत असलेले काम मोठे होईल. विस्तार होईल. तुम्हाला एक महत्त्वाचा टप्पा गाठता येईल. बऱ्याच गोष्टींची सूत्रे तुमच्या हातात असतील. त्यामुळे तुम्हाला जबाबदारीने वागण्याची गरज आहे. वडील किंवा मोठ्या आदरणीय व्यक्तींचा दबदबा राहील. या आठवड्यात तुमचा आत्मविश्वास बळावेल. पण अती विश्वास, अभिमान, गर्व हे तुम्हाला बाधक ठरु शकतात. म्हणून पाय जमिनीवर ठेवा. सामर्थ्यवान अशी एखादी सुरुवात करा.

**मिथुन :** हा सप्ताह तुमच्यासाठी परीक्षेचा असणार आहे. तुमचा संयम, तुमचा सात्विक भाव आणि तुमची सचोटी या गोष्टींना धक्का लागण्याचे प्रसंग येऊ शकतात. कामे रखडली जातील. काही प्रमाणात हतबल झाल्यासारखं वाटू शकतं. या आठवड्यात तुम्ही स्वतःला कणखर बनवण्याची गरज आहे. कुठल्याही आमिषाला भुलू नका. लाचारी पत्करू नका. सात्विक मनाला योग्य वाटत नसेल ते काम अजिबात करू नका. कोणतेही नियम मोडू नका. जोखीम उचलू नका. व्यसनात गुंतू नका. अती तिथे माती हे लक्षात ठेवा! आत्मसंयम ठेवा!

**कर्क :** हा सप्ताह तुमच्यासाठी अवघड वळणाचा आहे. किरकोळ दुखापत होऊ शकते म्हणून सावकाश काम करा. मार्ग पटकन सापडणार नाहीत. बरीच जबाबदारी अंगावर पडेल. पण तुम्हाला त्रास देणाऱ्या काही गोष्टी आता संपणार आहेत, हा विश्वास ठेवा! या आठवड्यात तुम्ही परिस्थितीशी झगडायला जाऊ नका. लोकांशी बोलताना नम्रपणे आणि कमीपणा घेऊन बोललात तर त्रास कमी होईल. आत्ता तुमचे वर्चस्व दाखवण्याची वेळ नाही. विश्रांती घ्या. मान, पाठ, कंबर आणि डोकं हे काही दुखेल असं मुद्दाम वागू नका. झोप पूर्ण घ्या, रात्रीचे वाद आणि चर्चा टाळा.

**सिंह :** हा सप्ताह तुमच्यासाठी चढाओढीचा असणार आहे. किरकोळ वादविवाद किंवा भांडणं




होऊ शकतात. एखादी स्पर्धा किंवा परीक्षा द्यायची वेळ येईल. अपेक्षित यश गाठण्यासाठी अडथळे येऊ शकतात. काही लोकांमुळे हातची संधी जाऊ शकते. नोकरी व्यवसायात तुमच्या मताला किंमत मिळण्यासाठी तुम्हाला बरीच धडपड करावी लागेल. या आठवड्यात इतरांवर पटकन विश्वास ठेवू नका. लोकांना काहीतरी पटवून देण्यापेक्षा त्यांना ते आपोआप पटेल असं करुन दाखवा. तुम्ही मागे राहून किंवा हातपाय गाळून चालणार नाही, आलेल्या परिस्थितीशी दोन हात करा!

**कन्या :** हा सप्ताह तुमच्यासाठी आर्थिक मुबलकता घेऊन येत आहे. तुम्ही वस्तू, पैसे, लोक, कौशल्य यांनी युक्त असाल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हाल. घराबाबत किंवा जमिनीबाबत चांगली घटना घडेल. कौटुंबिक आनंद राहील. या आठवड्यात तुम्हाला तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. आर्थिक नियोजन नीट करा. कुठे आर्थिक गुंतवणूक करायची असेल तर करू शकता. लोकांना मदत करा. सगळ्यांचा सांभाळ करा. व्यावहारिक वागा, पण तुटक वागू नका. दानधर्म करा. गृहलक्ष्मीला प्रसन्न ठेवा!

**तूळ :** हा सप्ताह तुमच्यासाठी देवाण घेवाण करणारा असणार आहे. भौतिक किंवा आर्थिक पातळीवर लाभ होऊ शकतात. अडकलेल्या कामात काही प्रमाणत पुढे जाऊ शकता. आहे ती परिस्थिती सुधारेल, एक प्रकारची स्थिरता वाटेल. अडकलेले पैसे सुटू शकतात. एखादे बक्षीस मिळू शकते. या आठवड्यात तुम्ही इतरांना मदत करून आणि इतरांच्या मदतीने चालण्याची गरज आहे. अडलेल्या व्यक्तीला केलेली मदत तुम्हाला उपयोगी पडेल. इतरांशी वागताना बोलताना पक्षपातीपणा न करता काम करा.

**वृश्चिक :** हा सप्ताह तुमच्यासाठी वेगवान असणार आहे. तुमचे अडकलेले काम नक्कीच या काळात मार्गी लागणार अशी खूप शक्यता आहे. तुम्हाला कुठेतरी सारखी ये जा करावी लागू शकते. लगीनघाई असल्यासारखे वाटेल. चांगल्या कामासाठी धावपळ होईल. हवी असलेली बातमी येईल किंवा त्यासंबंधी काही माहिती कळेल. या आठवड्यात तुम्ही आळस झटकून कामाला लागण्याची गरज आहे. तुमच्याकडून कोणताही उशीर करु नका. तुमचे संभाषण संवाद यांकडे लक्ष द्या. तुमचा सक्रिय सहभाग ठेवा. काही कामांचा आपणहून पाठपुरावा करा. जितके कष्ट कराल तितके फळ हे निश्चित!

**धनू :** हा सप्ताह तुमच्यासाठी संभ्रम आणि शंका निर्माण करणारा ठरु शकतो. तुमचा स्वतःवरचा विश्वास कमी होऊ शकतो. इतरांनी तुमच्या डोक्यात काहीतरी घातले तर तुम्ही पूर्णपणे त्यांच्या प्रभावाखाली राहाल अशी शक्यता दिसते आहे. पण स्वतःला मजबूत ठेवले, मन भक्कम ठेवले तर हा सप्ताह तुमच्यातील कलेला, सृजशीलतेला वाव देणारा ठरेल! या आठवड्यात तुम्ही मनावर ताबा ठेवण्याची गरज आहे. मनाप्रमाणे वागता वागता तुम्ही वाहवत तर जात नाही ना याकडे लक्ष द्या. ध्यान मेडीटेशन प्रार्थना करा.

**मकर :** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक, आर्थिक समाधानाचा असणार आहे. जे पाहिजे ते मिळण्याची खूप शक्यता आहे. एखादं लहान ध्येय पूर्ण होईल. आर्थिक धनलाभ सुद्धा होऊ शकतो. कुटुंबामध्ये काही कारणाने आनंद राहील, एकोपा राहील. सगळे जण मिळून कुठल्यातरी आनंदात सहभागी होतील. ज्येष्ठ व्यक्ती किंवा नातेवाईकांच्या भेटीगाठी होतील.

या आठवड्यात तुम्ही तुमच्या ध्येयावर पूर्ण मेहनत करण्याची गरज आहे. शेवटचा टप्पा आला आहे, चिकाटीने पुढे चाला. आपल्या माणसांवर किंवा आवडीच्या वस्तूवर पैसे खर्च करा, त्यात काही चूक नाही, फक्त अतिरेक नको!

**कुंभ :** हा सप्ताह तुमच्यासाठी तडजोडी करण्याचा आहे. अपेक्षित यश मिळवणे कठीण आहे. बरेच कष्ट करावे लागतील. कसलीतरी कमतरता जाणवेल. लोकांवर अवलंबून राहावं लागेल. इतरांकडून हीन वागणूक मिळू शकते. पण या सगळ्यातूनच आजची रात्र ही उद्याच्या पहाटेची चाहूल घेऊन येते याचा अनुभव तुम्हाला येईल. या आठवड्यात तुम्ही स्वतः संयम ठेवण्याची गरज आहे. गरजा कमी करा. सध्या मोठी गुंतवणूक किंवा महत्त्वाचे व्यवहार टाळा. परोपकार करण्याचा प्रयतक करा. गरिबांना मदत करा. आरोग्य सांभाळा!

**मीन :** हा सप्ताह तुमच्यासाठी परीक्षेचा असणार आहे. एखादं ध्येय किंवा एखादं पूर्ण होत आलेलं काम हुकण्याची शक्यता आहे त्यामुळे सतर्क रहा. कोणाकडून फसगत होण्याची शक्यता आहे म्हणून नवीन लोकांसोबत काम टाळा. प्रवासात तर होऊ शकतो म्हणून वेळेच्या आधीच घरातून निघा. तुम्ही केलेलं काम खात्री करून घेण्यासाठी दोन वेळा तपासून बघा. या आठवड्यात तुम्ही कोणत्याही बाबतीत सवलत घेऊ नका. नियम पाळा, त्यात दुर्लक्ष नको. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. पैशाचे व्यवहार किंवा इतर महत्वाची कामे या सप्ताहात शक्यतो करु नका.

## नावात बदल

पासपोर्टमध्ये माझे नाव **विजया भटू पाटील** असे झालेले आहे. व ते नावात बदल **विजया अजय पाटील** या नावाने ओळखावे.

**विजया अजय पाटील**
१०६, जय मल्हार नगर, साक्री रोड, धुळे

## एच.आर.पटेल फार्मसीत सावरकर जयंती साजरी

शिरपूर, दि.३०- येथील एच.आर. पटेल फार्मसी महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती देशभक्तिपूर्ण वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी. बारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राष्ट्रनिष्ठ विचारांचा, क्रांतिकारक कार्याचा तसेच भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या मोलाच्या योगदानाचा आढावा घेतला. सावरकरांनी केलेल्या सामाजिक सुधारणा व देशप्रेमाची प्रेरणा विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आत्मसात करावी, असे आवाहन त्यांनी केले.

## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरीफीकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील स नं.५६७/१/अ पैकी प्लॉट नं.३६ चे एकूण क्षेत्र १७६.०० चौ.मी. यास विस्तारित सि.स.नं.९६२ चे एकूण क्षेत्र १७५.५० चौ.मी. सत्ताप्रकार क यापैकी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना विक्री केला तो सामाइकातील अविभाज्य पूर्वेकडील भागाचे क्षेत्र ८३.५० चौ.मी. बखळ प्लॉट. यांसी प्लॉटची मापे व चतुःसिमा येणेप्रमाणे..

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस : | ०५.२५ मी., | प्लॉट नं.३७, |
| पश्चिमेस : | ०५.२५ मी., | प्लॉट नं.३६ पैकी उर्वरित भाग, |
| दक्षिणेस : | १६.०० मी., | ६ मी. रस्ता, |
| उत्तरेस : | १६.०० मी., | प्लॉट नं.२५ |

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक गणेश भटू लिंगायत रा.धुळे यांचेशी सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या टायटल व्हेरीफीकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह & लायसन्स, भाडेपट्टा, वारसहक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची टायटल व्हेरीफीकेशन नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दि.३०/०५/२०२६.

**ॲड.विवेक डी.देशमुख**
ऑफिस- प्लॉट नं.५, भावसार कॉलनी, जमनागिरी रोड, धुळे.
**मो.नं.८३२९२५४००५, ८६८६२५४००५**

## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम जनता, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था, इत्यादी यांना जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे, धुळे-२ ता.धुळे जि.धुळे येथील सि.स.नं.१४९८/१ चे एकूण क्षेत्र २२९.९० चौ.मी. सत्ताप्रकार अ यापैकी अविभक्त हिश्याचे क्षेत्र २१.४६ + २१.४६ चौ.मी. असे दोन्ही मिळून क्षेत्र ४२.९२ चौ.मी यामध्ये सुमारे ४६ वर्ष जुने कडी पटाईचे बांधीव घराचे क्षेत्र ३४.८५ चौ.मी. मिळकत यांसी चतु:सीमा संपूर्ण मिळकतीची पुर्वेस- रस्ता, पश्चिमेस- रस्ता, दक्षिणेस- सि.स.नं.१४९८/२, उत्तरेस- सि.स.नं.१४९७. येणे प्रमाणे अविभक्त हिश्याची मिळकत १) श्री.अनिल ओमप्रकाश अग्रवाल, २) सौ.कंचन ओमप्रकाश अग्रवाल, दोन्ही रा.उपाध्ये लॉज जवळ, ता.जि.धुळे यांचे मालकीचे व कब्जे उपभोगातील असून वरील मिळकत संबंधी कोणाची खरेदी, विक्री, गहाण, बक्षिस, टाच, जप्ती, राष्ट्रियकृत बॅक बोजा, पतसंस्था बोजा, को.ऑप.बॅक बोजा, वारसा हक्क, वहिवाट हक्क, वाटणी हक्क, जनरल मुख्त्यारपत्र अधिकार, सौदा पावती वरील सौदा पावती, करारनामा वगैरे इतर कुठलेही हस्तांतरीत व्यवहार असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत लेखी तक्रार खालील दिलेल्या पत्त्यावर कळविण्यात याव्यात तसेच प्रत्यक्ष मुळ कागदपत्र दाखवून आमचे अशीलांची खात्री करून द्यावी. मोबाईल व्दारे, पोस्टाने अथवा परस्पर वर्तमानपत्राव्दारे घेण्यात येणाऱ्या हरकती अथवा तक्रारी वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

येणेप्रमाणे पक्षकाराने दिलेल्या माहितीनुसार आमचे मार्फत जाहीर नोटीस असे. धुळे, दिनांक- ३०/०५/२०२६.

**ॲड.श्री.अमित अशोक वाघ,** नोटरी (भारत सरकार)
२२, श्रीराम वाटीका, मधुबन कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.
**मो.नं.९८२३१३६००७**

## जाहीर नोटीस

या व्दारे तमाम जनतेस, सर्व बँका, सर्व वित्तीय पतसंस्था, सावकार व इतर यांना कळविण्यात येते की,

तु.जि.जळगांव, पो.तु.ता.अमळनेर, येथील मौजे अमळनेर येथील सिटी सर्व्हे नं.२१४२ त्यासी क्षेत्र १७३.९० चौ.मी. त्यापैकी पुर्वेकडील मधल्या भागचे क्षेत्र ४०.३३ चौ.मी. ही मिळकत. त्यासी चुर्तसीमा खालील प्रमाणे

पुर्वे- रस्ता, पश्चिम- सि.स.नं.२१४२ चा भाग,
दक्षिण- सि.स.नं.२१४२ चा भाग, उत्तर- सि.स.नं.२१४२ चा भाग.

ज्या अर्थी वरील मिळकत ही मयत शांताराम भिवसन बडगुजर यांच्या नावावर होती, मयत शांताराम भिवसन बडगुजर हे दिनांक-०८/०८/२०२४ रोजी अमळनेर, ता.अमळनेर, जि.जळगांव, येथे मयत झाले असून, यांचे मृत्युनंतर वरील मिळकतीसाठी १) विजया शांताराम बडगुजर, २) ज्ञानेश्वर शांताराम बडगुजर, ३) अमोल शांताराम बडगुजर, ४) चैताली किशोरसिंग लोही हे त्यांचे कायदेशीर वारस आहे.

त्या अर्थी सदर वरील नमुद वारसांनी पैकी अन्य कोणीही वारस असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत कोणाचीही, कुठल्याही प्रकारची हरकत किंवा सदर मिळकती ही कोणत्याही वित्तिय संस्था अगर सावकार तसेच कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, जप्ती, टांच, वारस, बक्षिस, बोजा, सौदा, इ. असल्यास ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर प्रत्यक्ष हरकती सोबत योग्य तो कागदो पत्री पुरावासादर करून शहानिशा करून दयावी. मुदती नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत,

कळावे प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती, हजर केलेले दस्त व सांगणे वरून आमचे मार्फत प्रसिध्दिस दिली असे.

धुळे, दि.३०/०५/२०२६.

**ॲड.कमलेश राजेंद्र मोरे**
२८, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९९२३४९०४६९**

## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरीफीकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतींचे वर्णन-** तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी जि.प.व ता.प.स धुळे पैकी धुळे म.न.पा. हद्दीतील मौजे वलवाडी येथिल स.नं.१९८ पैकी

१) प्लॉट नं.५२ चे एकूण क्षेत्र १६०.०० चौ.मी., १७२२ चौ.फुट, बखळ प्लॉट.
यासी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं.५३, पश्चिमेस: प्लॉट नं.५१,
दक्षिणेस : गट नं.१९७/१, उत्तरेस : ०९ मी. रस्ता.

२) प्लॉट नं. ५३ चे एकूण क्षेत्र १७६.०० चौ.मी., १८९४ चौ.फुट, बखळ प्लॉट.
यासी चतु:सिमा पुर्वेस : १२ मी. रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.५२,
दक्षिणेस : गट नं.१९७/१, उत्तरेस : ०९ मी. रस्ता.

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक संगिता सतीष बागुल यांचेशी सौदा केलेला आहे. सबब तमाम लोकांना या टायटल व्हेरीफीकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील नमुद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. १५ दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची टायटल व्हेरीफीकेशन नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दि.३०/०५/२०२६.

**ॲड.मंगेश बी.सोनवणे**
ऑफिस- एस.२, गुरूदत्त संकुल, जमनागीरी रोड, धुळे.
**मो.नं.७५८८१२७४७७, ९४०४७३६७९६**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो. तु.ता.धुळे पैकी मौजे धुळे येथील धुळे मनपा हद्दीतील स.क्र.४९३/१ अ ब क/३ पैकी प्लॉट नं.३२२, त्यासी क्षेत्र ६० चौ.मी. त्यासी सि.स.नं.१०२३५ पैकी क्षेत्र ६० चौ.मी. यामधील दुमजली बांधीव खालचे मजल्यावरील ३ रूम व वरचे मजल्यावरील २ रूम, संडास बाथरूमसह बांधीव घराचे क्षेत्र या वर्णनाची मिळकत त्यासी चर्तु:सिमा खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| पुर्वेस- | ६ मी रस्ता, |
| पश्चिमेस- | स.नं.४९२, |
| दक्षिणेस- | प्लॉट नं.३२१, |
| उत्तरेस- | प्लॉट नं.३२३. |

ही मिळकत श्रीमती मंगलबाई अनिल सुर्यवंशी रा- समता नगर, शासकीय दुध डेअरी समोर, धुळे, ता.जि.धुळे यांच्या मालकीची असून कब्जेउपभोगातील आहे. सदर वर वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक यांचेशी कायम खरेदीने घेण्याचे ठरले असून, तसा सौदापावतीचा व्यवहार केलेला असून बयाणा रक्कम देखील मालकांना अदा केलेली आहे. आमचे अशिल लवकरच वरील मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर नमूद वर्णनाची मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा हक्क अथवा वित्त संस्था बँका पतसंस्था यांचा सदर मिळकतीवर बोजा असल्यास मुळ कागदपत्रासह खालील पत्त्यावर ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा व आपली लेखी हरकत नोदवावी. परस्पर जाहीर हरकत घेवू नये अन्यथा आमचे अशिलावर नमूद मिळकत ही निर्बोज निर्वेज आहे असे समजून येत्या ७ दिवसात व्यवहार पूर्ण करतील. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे होणाऱ्या खर्चास व परिणामास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या कागदपत्रे व माहितीच्या आधारे आमचे मार्फत दिले असे.

धुळे, दिनांक:- ३०/०५/२०२६.

**ॲड.महेश अरूण चव्हाण**
प्लॉट नं.७/ब, विशाल इस्टेट, राष्ट्रवादी भवन जवळ, स्टेशन रोड, धुळे
**मो.नं.८२७५००७२१८ ९३७०३२५१०५**

## CHANGE OF NAME

I have Change My Old Name From **MOMIN AFEEFA IFTEKHAR AHMED** My New Name **MOMIN AFEEFA MOHAMMAD IMRAN** as per Documents
**ADD- 363/96 ALLAMA IQBAL CHAWK MAULVI GANJ RAHMANI MEDICAL, DHULE**

## CHANGE OF NAME

I have Change My Old Name From **ZAMEER AHMAD USMAN GHANI** to My New Name **ZAMEER AHEMAD USMAN GANI ANSARI** as per Documents
**ADD- 4334, LANE NO.4 AGRA ROAD DEOPUR NOORANI MASJID, DHULE**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, धुळे म.न.पा. हद्दीतील मौजे धुळे येथील स.नं. ४७५/१+ ४७५/२ पैकी प्लॉट नं.४९अ चे एकूण क्षेत्रफळ १३५ चौ.मी., प्लॉट नं.४९ब चे एकूण क्षेत्रफळ १३५ चौ.मी. व प्लॉट नं.५०अ चे एकूण क्षेत्रफळ १३५ चौ.मी. बखळ प्लॉट यासी तिनही प्लॉटची एकत्रित चतु:सिमा- पूर्वेस- प्लॉट नं.५०ब, पश्चिमेस- प्लॉट नं.४८ब, दक्षिणेस- रस्ता ९ मी., उत्तरेस- स.नं.४७६.

येणेप्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील मिळकत ही श्री राहुल किशोर नाहर रा.१७७, जयप्रकाश वार्ड, करेली ता.करेली जि.नरसिंहपूर (मध्यप्रदेश) यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे मिळकत बखळ प्लॉटस हे आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी, जनरल मुखत्यार हक्क, मृत्युपत्र, सौदापावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर वैयक्तिकपणे कागदपत्रासह कळवावी. मुदतीत हरकती अगर तकारी न आल्यास आमचे अशील सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या अशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली आहे. दिनांक- ३०/०५/२०२६, ठिकाण- धुळे.

**ॲड.प्रमोद एम.चौधरी**
११४, गोविंद अपार्टमेंट, देवपूर, धुळे. **मो.नं.९८६०७०६१७१**

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS **RUKHSANA BI RAFIK ABDUL** MY NEW NAME IS **SHAIKH RUKHSANA BI RAFIK ABDUL**
**ADD- 116/117, KASALI MOHALLA, AMALNER PO.AMALNER, DIST. JALGAON-425401**

## CHANGE OF NAME

I have Change My Old Name From **SADIYA TABASSUM MD.SHABAN** to My New Name **SADIYA TABASSUM ZAMEER AHEMAD ANSARI** as per Documents
**ADD- 4334, LANE NO.4 AGRA ROAD DEOPUR NOORANI MASJID, DHULE**

## CHANGE OF NAME

I have Change My Old Name From **FATEMA BANO MOHAMMAD SHAMAUN** to My New Name **FATIMA BI MOHD SHAMAUN ANSARI** as per Documents
**ADD- PLOT NO.145, SULTANIYA NAGAR NEAR ASHABE SUFFA MASJID, DHULE**

## पाहिजेत

निशात वेल्फेअर अँण्ड एज्युकेशन सोसायटी कुकडेल, शहादा ता.शहादा जिल्हा नंदुरबार संचलित निशात हायस्कूल कुकडेल, शहादा ता.शहादा जिल्हा नंदुरबार या १००% अनुदानित अल्पसंख्यांक व अल्पभाषिक उर्दू माध्यमिक शाळेत सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षा पासून खालील प्रमाणे पदे शासनाचा अटी व शर्तीनुसार भरावयाचे आहे.

| पद | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | वेतन श्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|
| शिक्षण सेवक | १ | बी.एससी.डी.एड./बी.एड. (गट-६ वी ते ८ वी) (पायाभूत पद मान्य) | शासन नियमानुसार | TET/CTET असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| शिक्षण सेवक | १ | एच.एस.सी./बी.ए./ डी.एड., (गट ५ वी) | शासन नियमानुसार | TET/CTET असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |

तरी उर्दू भाषा अवगत (लिहिता/वाचता) असणारे वरील अर्हताधारक इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी दिनांक ०७/०६/२०२६ रविवार रोजी सकाळी ठीक ११:३० वाजता स्वखर्चाने आपले अर्ज तसेच मूळ शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रांसह व छायांकित प्रतीसह लेखी परीक्षा व मुलाखती साठी खालील पत्त्यावर हजर राहावे. सदरची पदे मा.शिक्षणाधिकारी सो. यांच्या मान्यतेचा अधीन राहून भरण्यात येतील. शिक्षक पदे संचमान्यतेनुसार कमी अधिक होवू शकतात. उमेदवाराची निवड करण्याचा अंतिम अधिकारी शालेय समितीस राहील.

पत्ता :- निशात हायस्कूल व ज्यू.कॉलेज ऑफ सायन्स,
सुन्नी जामा मस्जिद जवळ कुकडेल, शहादा ता.शहादा जिल्हा नंदुरबार.

| मुख्याध्यापक तथा मानद सचिव | चेअरमन |
|---|---|
| शालेय समिती, निशात हायस्कूल कुकडेल, शहादा ता.शहादा जिल्हा नंदुरबार | शालेय समिती, निशात हायस्कूल कुकडेल, शहादा, ता.शहादा जिल्हा नंदुरबार ४२५४०९ |



## पान १ वरुन

### ना.पाटलांनी बारा मुद्यांचा मसुदा जरांगे पाटलांच्या हाती

आहे, असे विखे पाटील म्हणाले.

**सातारा गॅझेटच्या मुद्द्यावर कायदेशीर अडचणींचा उल्लेख**

मराठा समाजाकडून सातारा गॅझेटसह विविध मागण्या सातत्याने पुढे केल्या जात आहेत. यावर बोलताना विखे पाटील यांनी काही मागण्यांमध्ये कायदेशीर पेच असल्याचे स्पष्ट केले. प्रत्येक मागणीला तत्काळ मंजुरी दिली आणि नंतर ती न्यायालयात टिकली नाही, तर समाजाची फसवणूक होईल. त्यामुळे प्रत्येक निर्णय कायदेशीरदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे सांगितले की, काही मागण्यांबाबत विभागीय स्तरावर तातडीने प्रशासकीय आदेश जारी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र दीर्घकालीन आणि संवेदनशील विषयांवर कायदेशीर सल्ला घेऊनच निर्णय घेतले जातील.

**दगडाखाली विंचू तसा अभ्यासक जरांगेंचा संताप**

सरकारने दिलेल्या बारा मुद्द्यांच्या मसुद्यावर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे पाटील यांनी काही तथाकथित मराठा आरक्षण अभ्यासकांवर तीव्र टीका केली. त्यांनी सांगितले की, आरक्षणाच्या विषयावर अनेकजण स्वतःला अभ्यासक म्हणून पुढे करत असून त्यामुळे समाजामध्ये संभ्रम निर्माण होत आहे. एखादा जीआर आला की सुरुवातीला हेच लोक त्याचे समर्थन करतात. काही दिवसांनी त्याच निर्णयात शेकडो त्रुटी असल्याचे सांगतात. त्यामुळे समाज गोंधळात पडतो. अशा वागणुकीमुळे मराठा समाजाची दिशाभूल होत आहे, असा आरोप जरांगे यांनी केला.

**कोर कमिटी आणि तज्ज्ञांकडून मसुद्याचा अभ्यास**

सरकारने दिलेल्या बारा मुद्द्यांच्या मसुद्यावर तातडीने भूमिका न घेता त्याचा सखोल अभ्यास करण्याचा निर्णय जरांगे पाटील यांनी जाहीर केला आहे. त्यांनी सांगितले की, त्यांच्या कोर कमिटीसह कायदेतज्ज्ञ आणि अभ्यासक या मसुद्याचे बारकाईने परीक्षण करतील. त्यानंतरच आंदोलनाची पुढील दिशा आणि अंतिम भूमिका जाहीर केली जाईल. दरम्यान, विखे पाटील यांनी पुन्हा एकदा संवादाचा मार्ग खुला असल्याचे सांगत आंदोलनकर्त्यांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.

**महाराष्ट्राचे लक्ष आता बारा मुद्द्यांच्या मसुद्याकडे**

सरकारकडून अधिकृत मसुदा सादर झाल्यानंतर मराठा आरक्षण आंदोलन निर्णायक टप्प्यात पोहोचल्याचे मानले जात आहे. जरांगे पाटील यांची पुढील भूमिका, कोर कमिटीचा अहवाल आणि सरकारच्या बारा मुद्द्यांमधील नेमक्या तरतुदी याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. आगामी काही दिवसांत या मसुद्यावरील चर्चा आणि त्यातून होणारे निर्णय मराठा आरक्षणाच्या लढ्याची पुढील दिशा ठरवू शकतात.

### महाराष्ट्र राज्यावर दुष्काळाचे संकट

महाराष्ट्र, कोकण आणि राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसाचा तुटवडा जाणवू शकतो. मात्र, मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील काही तुरळक भागांमध्ये सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

यापूर्वी हवामान विभागाने पहिल्या दीर्घकालीन अंदाजात देशभरात सरासरीच्या ९२ टक्के पावसाची शक्यता व्यक्त केली होती. मात्र, नव्या अंदाजात पर्जन्यमान आणखी कमी राहण्याची शक्यता दर्शविण्यात आली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, १९७१ ते २०२० या कालावधीत देशातील मान्सून पावसाची सरासरी ८६८.६ मिलिमीटर इतकी आहे. यामध्ये सरासरीच्या ९४ ते १०४ टक्के पाऊस हा सर्वसाधारण मानला जातो. मात्र, यंदा पावसाच्या प्रमाणात तुटवडा राहण्याची शक्यता तब्बल ६० टक्के असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

याउलट सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता केवळ दोन टक्के आहे. कमी पावसाच्या या अंदाजामुळे राज्यातील शेतकरी वर्गाची चिंता वाढली आहे. खरीप हंगामातील पेरणी, पिकांची वाढ आणि जलसाठ्यांवर याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आगामी काळात पावसाच्या स्थितीकडे शेतकरी आणि प्रशासनाचे लक्ष लागले आहे.

### केंद्र व राज्य सरकारच्या धोरण विरुद्ध ऐल्गार

राज्य शासनाच्या तीव्र शब्दात निषेध करत त्यांनी कशा प्रकारे आपल्या जंगल जमीन विकून भांडवलदाराच्या घशात घातले आहेत हे सांगितले. अदानी व अंबानी यांच्या गल्ला भरण्यासाठी मोदी शहा यांच्या सरकार आणि राज्याचे दलाल काम करीत आहे.आज हजारो हेक्टर जमीन कंपनीच्या घशात घालून जल जंगल जमीन संपवून टाकले .आपण वर्षानुवर्ष यासाठी लढत आहे परंतु सरकार आपल्याला हक्काचे सातबारा देण्यास तयार नाही आणि भांडवलदारांना देत आहेत. परदेशातील विद्यापीठ आणून येथे विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत आणि आता पहिलीपासून हिंदी शिक्षणाची सक्ती करत आहेत .ही सक्ती कशासाठी आता विद्यार्थ्यांना पुरातन शिक्षण देण्याचे सरकारचे नियोजन आहे. आमच्या मुलांना पुरातन शिक्षण नको आजच्या विज्ञान तंत्रज्ञान व टेक्नॉलॉजी शिक्षण पाहिजे ज्योतिषशास्त्र व पुरातन विभागाचे शिक्षण तुम्ही तुमच्या पोरांना शिकवा असे वक्तव्य किशोर ढमाले यांनी केले. यावेळी सभेचे प्रमुख व्यक्ता राजेंद्र बावके यांनी बोलतांना सांगितले की वनहक्क कायद्याला दोन दशके पूर्ण होत असतानाही अनेक पात्र लाभार्थ्यांना हक्काची जमीन नोंद मिळालेली नाही. समृद्धी महामार्ग, शक्तीपीठ महामार्ग, बुलेट ट्रेन, अभयारण्ये आणि विविध खनिज प्रकल्पांच्या नावाखाली आदिवासींच्या जमिनी आणि जंगलांवर अतिक्रमण होत असल्याचा आरोप त्यांनी केला. विकासाच्या नावाखाली गरीब आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी हे भांडवलदारांच्या घशात घालण्याचे काम करीत आहेत .आज महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषद, मराठी शाळा तसेच आश्रम शाळा बंद करण्याचा विचार करीत आहे. जेथे आपले गोरगरीब शिक्षण घेत आहेत तेच शाळा शासन बंद करत आहेत. याचा अर्थ आपल्या मुलांनी शिक्षण घ्यायला नको व जो आज श्रमिक म्हणून जगत आहे त्यांची पुढील पाच पिढी ही श्रमिक म्हणूनच राहायला पाहिजे अशी शासनाची विचारधारा आहे .भ्रष्टाचार करायच्या निवडून यायचं पुन्हा भ्रष्टाचार करायच्या जनतेमध्ये पैसे वाटायचे आणि पुन्हा सत्तेत यायचे हे प्रस्थापित लोकांचे राजकारण आज सर्वांना दिसत असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी सर्व डाव्या, लोकशाहीवादी आणि परिवर्तनवादी शक्तींनी एकत्र येण्याची गरज असल्याचे मत त्यांनी मांडले. यावेळी पक्षाच्या आगामी राजकीय वाटचालीबाबत चर्चा करण्यात आली. मार्क्सवाद, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित लोकशाही परिवर्तनाची दिशा समाजापुढे मांडण्याचा निर्धार अधिवेशनातून व्यक्त करण्यात आला. अधिवेशनाचे आभार प्रदर्शन कॉ .विक्रम गावित यांनी केले.अधिवेशनाला सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नंदुरबारला स.पा.चे आ.अबू आजमींची सभा

कार्यकर्ते आणि समर्थकांचा समाजवादी पक्षात जाहीर प्रवेश होणार आहे. सभेदरम्यान पक्षाच्या आगामी राजकीय भूमिका, स्थानिक प्रश्न तसेच संघटन विस्तारावर मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. युवक, अल्पसंख्याक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर पक्षाची भूमिका मांडण्यात येणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजवादी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून नियोजन करण्यात आले आहे. या सभेला कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान १ वरुन

### तप्त उन्हात जरांगे पाटलांचे उपोषण

**आंदोलनाची पार्श्वभूमी आणि मागण्या**

मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र मिळावे, सगेसोयरे अध्यादेशाची तातडीने अंमलबजावणी व्हावी आणि आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले जावेत, या प्रमुख मागण्यांसाठी जरांगे पाटील आग्रही आहेत. सरकारने दिलेल्या आश्वासनांची मुदत संपल्याने त्यांनी पुन्हा एकदा उपोषणाचा मार्ग निवडला आहे. जोपर्यंत मराठा समाजाला हक्काचे आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे.

**समर्थकांची उपोषणस्थळी गर्दी**

जरांगे पाटील यांनी उन्हात उपोषण सुरू केल्याचे वृत्त समजताच, राज्यातील विविध भागांतून मराठा बांधव आणि त्यांचे समर्थक अंतरवली सराटीच्या दिशेने रवाना होत आहेत. कडक ऊन असूनही उपोषणस्थळी समर्थकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. कार्यकर्त्यांकडून जरांगे यांच्या प्रकृतीची काळजी घेतली जात असून, डॉक्टरांचे पथकही त्यांच्या तब्येतीवर लक्ष ठेवून आहे. तप्त उन्हात डोक्याला भगवा रुमाल बांधून उपोषणाला बसलेल्या जरांगे पाटील यांच्या या आंदोलनामुळे आता राज्य सरकारवर पुन्हा एकदा दबाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरकार यावर काय तोडगा काढणार, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

### इंधन बचतीचे धुळे पॅटर्न कौतुकास्पद

केली होती. पंतप्रधान मोदी यांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार अग्रवाल यांच्या नेतृत्वात येथील महापालिकेच्या साठ नगरसेवकांनी इंधनाची बचत करण्यासाठी स्वखर्चाने इलेक्ट्रिक बाईक (ई-बाईक) वापरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आज सायंकाळी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अग्रवाल, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे यांच्या उपस्थितीत चेतक कंपनीच्या शोरूममध्ये या ई-बाईक वितरणाचा कार्यक्रम झाला, त्यावेळी आमदार अग्रवाल बोलत होते. यावेळी महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सका पाटील, स्थायी समितीच्या सभापती लताबाई सोनार, गटनेत्या किरण कुलेवार, महिला व बालकल्याण सभापती उज्ज्वला ठाकरे यांच्यासह पक्षाचे सर्व महिला, पुरुष नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**इंधन बचतीला अनोखा प्रतिसाद : मंत्री रावल**

पालकमंत्री रावल म्हणाले, की आ.अनुप अग्रवाल आणि त्यांच्या सहकारी नगरसेवकांनी इलेक्ट्रिक बाइक खरेदी करण्याचा जो निर्णय घेतला तो खरेच कौतुकास्पद असून, त्यांना पाठिंबा देण्यासाठी मी आज येथे उपस्थित आहे. पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला हा अनोखा प्रतिसाद देशभरातील लोकप्रतिनिधींसाठी आचरणाचा ठरणार आहे. देशाच्या संकटकाळात जबाबदार जीवनशैलीचा अंगीकार हा फक्त भारतीय जनता पक्षाचा पदाधिकारी, कार्यकर्ताच करू शकतो, याचे आदर्श उदाहरण आमदार अग्रवाल व नगरसेवकांनी घालून दिले आहे. या सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो.

**विरोधकांच्या डोक्यातच कचरा : आ. अग्रवाल**

आमदार अग्रवाल म्हणाले, की महापालिकेचे भाजपचे सर्व नगरसेवक व काही पदाधिकारी साठ इलेक्ट्रिक बाईक आज ताब्यात घेत असल्याचे पाहून विरोधकांना आज पुन्हा पोटशूळ उठला. त्यांनी नेहमीप्रमाणे धुळे महापालिकेच्या कचरा ठेकेदाराने या बाइक खरेदी करून सर्व नगरसेवकांना दिल्याची आवई उठविली. तुमच्यासारख्या कचरा भरलेल्या डोक्यातून असेच विचार येणार, हे सर्वांना माहिती आहे. कचरा ठेकेदाराकडून तुमची तोडीपाणी होत नसल्याने तुम्ही सतत खोटे-नाटे आरोप करत आहात. खरे तर सर्व नगरसेवकांनी स्वखर्चाने या बाइक खरेदी केल्या आहेत. यातील काही नगरसेवकांनी फायनान्स कंपनीचे कर्ज काढून ही बाइक घेतली आहे. यामध्ये फक्त आणि फक्त पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हा निर्णय घेतला आहे. हा भारतातील पहिलाच उपक्रम ठरला असून, तो अभिनंदनीय आहे, असेही आमदार अग्रवाल यांनी नमूद केले.

### रेल्वेगेटमनला मारहाण करणाऱ्या वसावेला शिक्षा

त्यानुसार मोबाईलमध्ये वाहनाच्या क्रमांकाची नोंद करीत असल्याचा राग येवून सिमेंट मिक्सर वाहनाच्या चालकाने रेल्वेगेटमनला धमकावित तू गाडीचा नंबर का घेतला, तुला पाहतो असे बोलून नवापुरच्या दिशेने निघून गेला. तसेच काही वेळेनंतर सिमेंट मिक्सर वाहन चालक याने इतर ३ जणांसोबत येवून रेल्वे कॅबीनमध्ये प्रवेश करीत रेल्वेगेटमन कन्हैया कोकणी यांना लाकडी काठी, लोखंडी रॉडने बेदम मारहाण करीत जिवेठार मारण्याची धमकी घेवून तिथून पसार झाला. याप्रकरणी कन्हैया कोकणी यांच्या फिर्यादीवरुन आरोपी जितेश सायतराव वसावे (वय ३२ रा. पाटीलफळी रायंगण ता. नवापुर) इतर ३अशांविरुध्द नवापुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही घटना दि.२ जुन २०२१ रोजी नवरंग गेटजवळ घडली होती. या गुन्ह्याचा तपास नवापुर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक नासीरखान पठाण यांनी शास्त्रोक्त पध्दतीने करुन महत्वाचे पुरावे जमा करीत त्यांच्याविरुध्द नंदुरबार येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले होते. या खटल्यातील सुनावणी नंदुरबार येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश यांच्या समक्ष झाली. या खटल्यात सरकार पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. यात साक्षीदार, पंच व तपास अधिकारी यांच्या साक्ष महत्वाच्या ठरल्या. यावरुन सबळ पुराव्याच्या आधारे आरोपी जितेश सायतराव वसावे याच्याविरुध्द गुन्हा सिध्द झाला. म्हणुन न्यायाधिशांनी भा.द.वि. कलम ३५३, ३३२ अन्वये दोषी ठरवत भा.द.वि. कलम ३५३ अन्वये ४वर्ष सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड आणि भा.द.वि. कलम ३३२ अन्वये १वर्ष सश्रम कारावास व १ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. या खटल्याचे कामकाज सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अॅड.व्ही.सी. चव्हाण तर मुख्य पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस उप निरीक्षक हेमंत मोहिते, पैरवी अंमलदार पो.हे.कॉ. नितीन साबळे, पो.हे.कॉ. शैलेंद्र जाधव, पो.कॉ. देवेंद्र पाडवी यांनी कामकाज पाहिले.

### डॉ.पाटलांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

भूमिका दर्शविल्याची माहिती देण्यात आली. प्रशासनाच्या या सकारात्मक भूमिकेचा विचार करून तसेच प्रलंबित प्रश्न मार्गी लागावेत या हेतूने मा. डॉ. गिरीश पाटील यांनी संघटनेला दि. १ जून २०२६ पासून प्रस्तावित असलेले असहकार आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. संघटनेने त्यांच्या विनंतीचा आदर राखून तसेच प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांवर विश्वास व्यक्त करत प्रस्तावित असहकार आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, प्रलंबित प्रस्तावांबाबत अपेक्षित कार्यवाही निश्चित कालावधीत पूर्ण होईल, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली असून या विषयावर संघटना सातत्याने लक्ष ठेवून राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील सर्व पदविकाधारक पशुधन पर्यवेक्षक, सहायक पशुधन विकास अधिकारी तसेच पशुधन विकास अधिकारी (गट-ब) यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन पशुचिकित्सा व्यवसायी संघटना, महाराष्ट्र राज्य, जिल्हा शाखा धुळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जनजागृती

जानवी संजय पाटील हिने उपस्थित सर्वांना तंबाखू सेवन न करण्याची प्रतिज्ञा दिली. उपस्थितांनी तंबाखूच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमास नवनिर्माण संस्थेच्या प्रकल्प व्यवस्थापक सुषमा सूर्यवंशी, कर्मचारी उज्वला कोकणी, मयूरी माळी, दिव्या शिरसाठ तसेच इतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून तंबाखूच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करून व्यसनमुक्त आणि निरोगी समाज घडविण्याचा संदेश देण्यात आला. नवनिर्माण संस्थेच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

## पं.दीनदयाल उपाध्याय जि.प्रशिक्षण महाअभियान कार्यशाळेचा उत्स्फूर्त वातावरणात शनिवारी समारोप

**शिरपूर, दि.३०- भारतीय जनता पार्टी तर्फे पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण महाअभियान-२०२६ अंतर्गत दोन दिवसीय कार्यशाळेचा शुभारंभ तांडे ता. शिरपूर येथील मुकेशभाई आर. पटेल मिलिटरी स्कूलच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. वंदे मातरम व महाराष्ट्र गीताने प्रशिक्षण कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली.**



धुळे जिल्ह्यातील भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध आघाड्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने या कार्यशाळेस उपस्थित होते.पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण महाअभियान-२०२६ अंतर्गत दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते २९ मे २०२६ रोजी मुकेशभाई पटेल मिलिटरी स्कूलच्या स्व. नानासाहेब उत्तमराव पाटील सभागृहात करण्यात आले.

यावेळी भाजपा धुळे जिल्हा प्रभारी रविजी अनासपुरे, आमदार काशिराम दादा पावरा, आमदार रामदादा भदाणे, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, धुळे भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, नंदुरबार जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी, जळगाव जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी, माजी जि.प.अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, उपनगराध्यक्षा सौ. संगिता देवरे, शिरपूर विधानसभा प्रभारी के. डी. पाटील, दिलीप लोहार व अनेक मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी कार्यशाळेच्या प्रारंभी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी देशासमोरील राजकीय, सामाजिक आव्हाने व आजची परिस्थिती या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी देशातील बदलती राजकीय परिस्थिती, सामाजिक परिवर्तन, जनतेच्या अपेक्षा तसेच कार्यकर्त्यांची जबाबदारी यावर भाष्य केले. भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता हा केवळ राजकीय कार्यकर्ता नसून समाजाशी बांधिलकी जपणारा घटक असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी तळागाळात सक्रिय राहण्याचे आवाहन त्यांनी केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी दिलीप लोहार होते.

त्यानंतर भाजपा धुळे जिल्हा प्रभारी रविजी अनासपुरे यांनी वैचारिक अधिष्ठान या विषयावर मार्गदर्शन केले. भारतीय जनता पक्षाची विचारधारा, राष्ट्रहिताची भूमिका, संघटनात्मक मूल्ये आणि कार्यकर्त्यांचे वैचारिक बळ यावर त्यांनी सविस्तर भाष्य केले. पक्षाच्या विचारसरणीचा प्रसार प्रभावीपणे करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सतत अध्ययनशील राहण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. या सत्राच्या अध्यक्षस्थानी आमदार रामदादा भदाणे होते.

आमदार काशिराम दादा पावरा यांनी विचार परिवार या विषयावर मार्गदर्शन करत संघटनात्मक समन्वय, सामाजिक बांधिलकी आणि कार्यकर्त्यांमधील सुसंवादाचे महत्त्व अधोरेखित केले. पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता हा समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी संवेदनशील असावा आणि जनतेमध्ये विश्वास निर्माण करावा, असे त्यांनी सांगितले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. तुषार रंधे होते.

## रोकडोबा मंदिरातील दानपेटी फोडली मुर्तीवरील चांदीचे चार मुकूट चोरले

**धुळे, दि.३०- तालुक्यातील आर्वी शिवारात रोकडे हनुमान मंदिरलगत श्रीराम मंदिरातुन चोरट्यांनी मुर्तीवरील चांदीचे चार मुकुट चोरले, दानपेटी फोडून त्यातील रोकड लंपास केली. चौऱ्याण्णव हजारांचा मुद्देमाल लंपास केला.**

मुंबई आग्रा महामार्गावर आर्वी शिवारात रोकडोबा हनुमान मंदिर आहे. मंदिरालगतच रामाचेही मंदिर आहे. आज पहाटे पुजारी राम मंदिर उघडण्यासाठी आले असता चोरीची घटना उघडकीस आली. धुळे तालुका पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. चोरट्यांनी मंदिरातील मुख्य दरवाजाचा कडी कोंडा तोडल, मंदिरातील चारही मुर्त्यांची चांदीचे मुकुट चोरले. दानपेटी फोडून रोकड काढून नेली, आज दुपारी घरफोडीचा गुन्हा दाखल झाला. मुकुटसह रक्कम असा चौऱ्याण्णव हजार तीनशे पस्तीस रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. उपअधीक्षक राजकुमार उपासे, धुळे तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक धनंजय पाटील, फॉरेन्सीक पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद खरात, हवालदार धनंजय मोरे, प्रकाश भावसार आदींनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. श्वान पथक व ठसे तज्ज्ञांना पाचारण केले.

**पाहिजेत**
अनुभवी
मॅनेजर, ड्रायव्हर
वॉचमन (फॅमिलीसह)
अर्जासह समक्ष भेटा
सकाळी १० ते सायं.७
अनुभव असल्यास प्राधान्य
राधाकृष्ण
मंगल कार्यालय
नकाणे रोड, रूपामाई
शाळेजवळ, धुळे
मो.९३०९५३१६६५
९४२२२९६२०५

**प्लॉट विकणे आहेत**
आर्वी NH-3 हायवेलगत केले नगर येथील गट नं.२२८ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत श्रीकृष्ण नगर येथील गट नं.२३२ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत भगवती विहार येथील गट नं.२६५/३/१ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
संपर्क - 9422792677, 8888192677

**वीर सावरकर जयंती निमित्त शुभारंभ**
**वीर सावरकर अपार्टमेंट**
फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.
फ्लॅट एरिया :- 1 BHK - 1000 स्के.फुट
2 BHK - 1200 स्के.फुट,
3 BHK - 1350 स्के.फुट
बुकिंगसाठी संपर्क
मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी
मो. 9405466937
इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)
मो. 9422789513
पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर
अकाऊंट कामासाठी
माणूस पाहिजे.
पत्ता- ग.नं.५, धुळे
मो.९७६५३७३५५९
९४०४३४४९९९

**भाड्याने देणे**
बांबू गल्लीत पहिल्या
मजला दर्शनी रस्त्याकडील
१००० फुटी हॉल वैद्यकीय
व्यवसायासाठी उपयुक्त.
8408958097

**पाहिजे**
ऑफिस
बॉय पाहिजे.
नितीन कॉम्प्युटर
शॉप मध्ये पंचवटी
टॉवर देवपूर, धुळे
9823134220

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी हुशार
व होतकरु मुले/मुली
फूलटाईम/पार्टटाईम
त्वरीत पाहिजेत.
- समक्ष भेटा -
मुंदडा बुक स्टॉल
पारोळा रोड ग.नं. ६, कॉर्नर, धुळे

**मंगल कार्यालय**
सूरते मंगल कार्यालय
खास पावसाळ्यासाठी
बूकींग संपर्क
विद्यानगरी देवपूर, धुळे
-: संपर्क :-
9823382447

**शेती बटाईने देणे**
सर्व सोयींनी युक्त १ एकर
कंपाऊंडसह देशी कोंबडी
पालन साठी व १ एकर
शेती बटाईने देणे आहे.
-: संपर्क :-
9403433767

**पाहिजेत**
मेडीकल एजन्सीमध्ये
कामासाठी मुले/मुली/
महिला पाहिजेत.
-: संपर्क :-
8483032975
9823716975

**पाहिजेत**
दुकानाच्या कामासाठी
शिकाऊ माणुस
चांगला पाहिजे.
श्रीकृष्ण इलेक्ट्रीकल
मामलेदार कचेरीसमोर, धुळे
9421619402

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

New Models
ऑफर .... ऑफर .... ऑफर ....
Authorised Dealer
LG Panasonic
Godrej




2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर*
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.*
आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर
श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०